दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ५ वे अंक –१३६ मंगळवार,दि.२१ जानेवारी २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-5th Issue-136 Tuesday, Dt.21 January 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Pages 4

# पंकजा मुंडेंच्या मनात बीडचे पालकमंत्रीपद न मिळाण्याची सल?



**म्हणाल्या – मी बीडची लेक, पालकमंत्रीपद मिळाले असते तर आनंद झाला असता**

**नागपूर – मी बीडची लेक आहे. मला बीडचे पालकमंत्रीपद मिळाले असते तर आनंद झाला असता, असे वक्तव्य पंकजा मुंडे यांनी केले आहे. मी पाच वर्ष बीडची पालकमंत्री होते. त्यावेळी बीडचा चांगला विकास झाला होता. बीडची सेवा करण्याची संधी मिळाली असती, तर आनंद झाला असता, असेही त्या म्हणाल्या. पंकजा मुंडे सोमवारी नागपूरमध्ये माध्यमांशी बोलत होत्या.**

**पंकजा मुंडे यांच्या या वक्तव्यामुळे त्यांच्या मनात बीडचे पालकमंत्रीपद न मिळाण्याची सल असल्याचे दिसत आहे.**

सरकारकडून नुकतीच पालकमंत्र्यांची यादी जाहीर करण्यात आली. मंत्रीपदाप्रमाणेच पालकमंत्री पदावरून काहींना संधी नाकारण्यात आली. सर्वांचे लक्ष लागून असलेले बीडचे पालकमंत्री पद हे मुंडे बंधू-भगिनीपैकी एकालाही न देता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे गेले. संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांचे नाव आल्यामुळे बीडचे पालकमंत्रीपद त्यांना देऊ नये, अशी बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेत्यांची मागणी होती. त्यामुळे धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांना बीडचे पालकमंत्रीपद नाकारल्याची चर्चा सुरू आहे.

मला बीडचे पालकमंत्रीपद मिळाले असते, तर मला आनंद झाला असता, अशी भावना पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली.

# आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली नगरपालिकेची आढावा बैठक



**बीड शहरातील नागरी प्रश्नांबाबत दिले निर्देश**

बीड ।प्रतिनिधी

शहरातील मुलभूत नागरी प्रश्नांच्या संदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी सोमवारी (दि.२०) रोजी नगर पालिकेची आढावा बैठक घेतली. स्वच्छता, पाणी पुरवठा, रस्ते, नाल्या, वीज आदि मुद्यावरून आ.संदीप क्षीरसागर यांनी अधिकार्यांना सुनावले. प्रत्येकवेळी कोणतेही काम सांगितले तर निधी नाही असे कारण सांगणार्या अधिकार्यांनी नगर पालिकेचे उत्पन्न वाढीसाठी काय प्रयत्न केले ? असा सवालही आ.संदीप क्षीरसागर यांनी उपस्थित केला. पाणी पुरवठ्यात हयगय खपवून घेणार नाही. स्वच्छतेच्या कामांना प्राधान्य द्या आणि उत्पन्न वाढीच्या दृष्टीने तात्काळ उपाययोजना करा असे निर्देश यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी दिले.

बीड नगर पालिकेतील मुख्याधिकार्यांच्या दालनात झालेल्या बैठकीस आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम, मुख्याधिकारी निता अंधारे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. यावेळी नागरीकांनी देखील आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडे शहरातील समस्या मांडल्या. आ.संदीप क्षीरसागर आणि माजी आ.सय्यद सलीम यांनी नगर पालिकेच्या उत्पन्न वाढीच्या अनुषंगाने काही उपाययोजना सुचविल्या आहेत. त्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सुचना देखील यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी दिल्या. नगरपालिकेतील पाणी पुरवठा व जलनिस्सारण विभाग, बांधकाम विभाग, अग्निशमन विभाग, अभिलेख विभाग, कर विभाग, लेखा परीक्षण विभाग, विद्युत विभाग, संगणक विभाग आदींसह नगररचना विभागाचा आढावाही आ.क्षीरसागर यांनी घेतला. यासोबतच गेल्या काही वर्षांपासून शहरातील मालमत्तांचा रिव्हीजन सर्व्हे झालेला नाही. हा सर्व्हे दर चार वर्षांनी केल्यास उत्पन्न वाढवता येईल. बीओटी तत्वावरील काही इमारती धुळखात पडलेल्या आहेत. त्या वापरात आणून त्यातूनही उत्पन्न वाढविता येऊ शकते. अशा

(उर्वरीत पान २ वर)

# उमेद बीड मिनी सरस प्रदर्शनाचा उत्साहात समारोप

बीड ।प्रतिनिधी

दिनांक १६ जानेवारी ते २० जानेवारी २०२५ या पाच दिवसापासून छत्रपती संभाजी महाराज मैदानात सुरू असलेल्या सरस प्रदर्शन व विक्रीचा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री आदित्य जीवने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक मा. श्रीमती संगीतादेवी पाटील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री वासुदेव सोळंके यांच्या उपस्थितीत उत्साहात समारोप करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर जि.ग्रा.वि.यंत्रणा विस्तार अधिकारी श्री वैभव जाधव , उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक श्री मुरहरी सावंत इ.उपस्थित होते.

जिल्हा परिषद , जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बीड व उमेद द्वारा आयोजित बीड मिनी सरस प्रदर्शन व विक्री मध्ये तब्बल विक्रमी २५ लक्ष ४७ हजार रुपयाची उमेद गटातील महिलांनी तयार केलेल्या विविध वस्तू , मसाले , शोभेच्या वस्तु , खाद्यपदार्थांची विक्री करण्यात आली.

समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आदित्य जीवने यांनी सांगितले की सदरील सरस यशस्वी होण्यामागे केवळ या पाच दिवसातील महिलांची मेहनत नाही तर वर्षातील ३६५ दिवस महिलांनी मेहनत घेतली आहे तेव्हा हे सर्व यशस्वीपणे

(उर्वरीत पान २ वर)



**वर्षभरात किमान तीन ते चार प्रदर्शनांचे आयोजन असावे – सीईओ आदित्य जीवने**

बीड मिनी सरस प्रदर्शनाला बीड शहरातील नागरिक विशेषतः महिला तसेच जिल्ह्यातील स्वयं सहाय्यता गटांचे पदाधिकारी कॅडर यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. समारोप कार्यक्रमात स्टालधारक महिलांनी वर्षभरात अशाच अनेक प्रदर्शनाचे आयोजन करण्याची अपेक्षा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे व्यक्त केली . मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने यांनी महिलांची ही अपेक्षा तात्काळ पूर्ण करताना , अशा प्रकारचे वर्षभरात किमान तीन ते चार प्रदर्शन आयोजित करण्याचा मनोदय आपल्या भाषणातून व्यक्त केला.

# पाणी तपासणीसाठी चक्क दारूच्या रिकाम्या बाटल्यात पाण्याचे नमुणे ; पाणी तपासणीवर प्रश्न चिन्ह :– डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालय आवारातील मुख्य अणु जीवशास्त्र जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत पाणी तपासणीसाठी चक्क दारुच्या रिकाम्या बाटल्यांत पाण्याचे नमुने घेण्याचा गंभीर प्रकार आढळून आला असुन काचेच्या बाटल्याची गरज असेल तर किमान प्रयोगशाळा प्रशासनाने त्या बाटल्याच्या झाकणावरील टँगो, बॉबी, संत्रा असे दारूचे लेबल तरी काढून वापरण्याची गरज आहे.त्यामुळे दारूच्या रिकाम्या बाटल्या योग्य रित्या निर्जंतुकीकरण करून वापरात घेतात की नाही? असा प्रश्न पडला असुन एकंदरीतच पाणी तपासणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असुन संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, रामनाथ खोड, शेख युनुस,सुदाम तांदळे, शेख मुबीन,शिवशर्मा शेलार, शेख मुस्ताक यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत स्वच्छता व पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव



पाटील, सचिव स्वच्छता व पाणी पुरवठा विभाग मंत्रालय मुंबई, उपसंचालक आरोग्य सेवा राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा पुणे यांना केली आहे.

बीड जिल्हा रुग्णालयाच्या आवारात पाठिमागील बाजूस असलेल्या पाणीतपासणी प्रयोगशाळेत चक्क देशीदारूच्या रिकाम्या बाटल्या पाण्याचे नमुणे ठेवल्याचे दिसून आले. सदरील बाटल्या योग्यरित्या स्वच्छ करून प्रयोगशाळा प्रशासन वापरात घेत

(उर्वरीत पान २ वर)

# भाजी भाकरीचा आस्वाद घेऊन भाविक भक्त देतात तृप्तीचा ढेकर


**साठ गावांच्या सहभागातून फुलसांगवीच्या सप्ताहात खुले अन्नछत्र**

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील फुलसांगवी या गावांमध्ये श्री.संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त गेल्या सहा दिवसापासून अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा नाम यज्ञ मोठ्या थाटात पार पडत आहे. या सप्ताहाच्या निमित्ताने दररोज हजारो भाविक भक्त अध्यात्मिक ज्ञान श्रवण करून या ठिकाणी भाजी भाकरीच्या भोजनाचा आस्वाद घेत तृप्ततेचा ढेकर देत आहेत. सुमारे ६० गावाच्या सहभागातून सुरू असलेल्या या अन्नछत्रात दरदिवस आठ ते दहा हजार लोक दर दिवस भोजनाचा आनंद लुटत आहे.

'वैराग्याचे महामेरू' श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ४९ व्या जन्मभूमी मौजे फुलसांगवी येथे श्री क्षेत्र मत्स्यंद्रनाथ गडाची मठाधिपती महंत जनार्दन महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली गेल्या सहा दिवसापासून भव्य स्वरूपात अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या थाटात पार पडत आहे. श्री. संत वामन भाऊ महाराज यांची पुण्यतिथी म्हणजे एक अध्यात्म ज्ञान रसाचीच पर्वणी असे समजून पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्त आपल्या संसारी जीवनाचा व्याप बाजूला सारून आठ दिवस फुलसांगवी मध्ये दाखल होत असतात. तर हजारो भाविक भक्त प्रत्येक दिवशीच आपल्या सोयीनुसार उपस्थिती लावून या ठिकाणी अध्यात्म ज्ञान रसाचे सेवन करून या ठिकाणी चालू असलेल्या भाजी भाकरीच्या पंगतीचा लाभ घेऊन तृप्तीचा ढेकर देत असतात. ही परंपरा लक्षात घेऊन प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी फुलसांगवी सप्ताह समितीच्या वतीने पंचक्रोशीतील सुमारे ६० गावांना भाकरीची पंगती देण्याचे अवाहन केलेले आहे. सप्ताह समितीचे अवाहन म्हणजे श्री संत वामनभाऊ महाराजांच्या दरबारी आपल्याला अन्नदान करण्याची एक सुवर्णसंधी समजून पंचक्रोशीतील ही गावे ( प्रत्येक दिवशी पाच सात गावातून ) हजारो भाकरींची पंगती घेऊन येत आहेत. तर इकडे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी हजारोंच्या संख्येनेच भाविक भक्त दर दिवस श्रीमद् भागवत कथा वसायंकाळी होणारे कीर्तन त्याचबरोबर

(उर्वरीत पान २ वर)




# पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने आयोजित

**जगावेगळ आव्हान स्वीकारणाऱ्या बीडच्या पहिल्या मुळव्याध तज्ञ डॉ. मीरा ढाकणे नागरे यांना जागतिक स्त्रीरत्न पुरस्कार जाहीर**

बीड ।प्रतिनिधी

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने जगा वेगळं आव्हान स्वीकारणाऱ्या मुली आणि महिलांना जागतिक स्त्रीरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी बीड जिल्ह्यातील पहिल्या महिला मुळव्याध तज्ञ डॉक्टर मीरा प्रशांत ढाकणे नागरे यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.



बुलढाणा जिल्ह्यातील सावरखेड तेजन येथील मूळ रहिवासी असलेल्या डॉक्टर मीरा प्रशांत ढाकणे नागरे या सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मल्या. गावातील शेतकऱ्यांपैकी पहिल्या कन्या त्या डॉक्टर बनणाऱ्या ठरल्या. जगा वेगळ आव्हान

(उर्वरीत पान २ वर)

शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
ॲडव्हान्स ॲनोरेक्टल (पाईल्स) लेझर सेंटर



डॉ. प्रशांत श.ढाकणे
M.B.B.S., M.D. (Anaesthesia)
भुलतज्ञ

डॉ.मीरा प्र.ढाकणे (नागरे)
B.A.M.S., M.S. (Shalya)
मुळव्याध, भगंदर व लेबर सर्जन



आपल्या बीड शहरामध्ये प्रथमच..... महिला मुळव्याध तज्ञ
डॉ. सौ. मीरा प्र. ढाकणे (नागरे) महिला रुग्णांच्या तपासणी करीता उपलब्ध राहतील

मुळव्याध करीता विशेष उपचार
* लेजर उपचार
* इंजेक्शन उपचार
* ऑपरेशन उपचार
* क्षारसुत्र उपचार,
* मुळव्याध, भगंदर
* फिशर, मलबध्दता
* संडासवाटे रक्तस्त्राव होणे.
* बस्ती उपचार
* स्तनातील गाठी
* शरीरावरील सर्व प्रकारच्या गाठी
* स्तनामध्ये पु होणे.
* मोस, जामखीळ व कुरुप काढणे
* गर्भावस्था किवा प्रसुतीनंतर
* मुळव्याध करीता विशेष आयुर्वेद उपचार

हॉस्पीटलचा पत्ताशिवसमर्थ मुळव्याध हॉस्पीटल साई कॉम्पलेक्स, आदर्श नगर, डि.पी.. रोड बसस्टॅन्डच्या पाठीमागे, डॉक्टर लाईन, बीड मो.क्र.9623079009

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ
सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय

# ट्रम्पोदयाचे टरकणे

एखाद्याच्या केवळ सत्तारोहणामुळे जगभरात इतकी हुरहुर, साशंकता, संभ्रम आणि संशय भावना दाटून येत असेल तर ही बाब त्या व्यक्तीसाठी अभिमानास्पद की लज्जास्पद याची चर्चा आता करणे निरर्थक. अमेरिकेचे ४७वे अध्यक्ष म्हणून आज, २० जानेवारीस, डोनाल्ड ट्रम्प शपथ घेत असताना 'आता पुढे काय' या प्रश्नचिन्हाच्या काळ्या सावलीचा झाकोळ सर्वत्र पसरलेला दिसतो. ट्रम्प यांचे व्यक्तिमत्त्व असे की ते याचा अभिमान बाळगतील. कोणताही आणि कोणत्याही देशातील नेता जनतेच्या मनात आश्वस्ततेची भावना निर्माण करण्याऐवजी भीती आणि दहशत यांस जन्म देत असेल आणि वर त्याचा अभिमान बाळगत असेल तर ते त्या समाजाचे अधोगती निदर्शक ठरते. ही अधोगती अमेरिकी समाज आता अनुभवेल. लोकशाहीत जनतेचा कौल शिरसावंद्या मानायला हवा, हे मान्य. त्यामुळे या अध्यक्षीय निवडणुकीचा निकाल सर्वांनी गोड मानून घ्यायला हवा, हेही मान्य. तथापि आधीच्या निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर तो कौल नाकारणारा, हिंसक आंदोलन करणारा आणि त्यासाठी न्यायालयात दोषी ठरलेला नेता ज्यावेळी पुन्हा एकदा निवडणुकीच्या रिंगणात उतरतो तेव्हा त्याच्या लोकशाही निष्ठा संशयास्पद असतात, हे अमान्य करता येत नाही. हे ट्रम्प यांच्याबाबत घडले. आता पुढील चार वर्षे समस्त विश्वास त्यांचे असणे सहन करावे लागणार आहे. हे सहन करणे सुरू होण्यापूर्वीच पुढे काय वाढून ठेवलेले आहे याची चुणूक ट्रम्प गेले दोन महिने दाखवत आहेत. अमेरिकी बाजारात येणाऱ्या परदेशी वस्तूंवर दणदणीत आयातशुल्क आकारण्यापासून त्या देशात स्थलांतरित होऊ इच्छिणाऱ्यांवर सणसणीत निर्बंध लादण्यापर्यंत ट्रम्प यांनी आपली धोरणदिशा स्पष्ट केलेली आहे. त्या बरोबरीने ट्रम्प यांची नेतृत्वक्षमता तीन मुद्द्यांवर जोखली जाईल.

इस्रायल-पॅलेस्टाइन संघर्ष, रशिया-युक्रेन युद्ध आणि अमेरिकेच्या महासत्तापदास आव्हान देणारा चीन हे तीन मुद्दे ट्रम्प यांचे नेतृत्वकौशल्य जोखतील. यातील पहिल्याबाबत ट्रम्प यांनी स्वत:ची शेखी आधीच मिरवलेली आहे. ''मी केवळ निवडून आलो या घटनेनेच इस्रायल-पॅलेस्टाइन संघर्ष मिटण्याची सुरुवात झाली'' अशा अर्थाचे केवळ ट्रम्प-मुखातून निघू शकते असे विधान त्यांनी केले. आता या संघर्षाचे निखारे विझलेले राहतील याची खबरदारी घेण्यात त्यांची कसोटी लागेल. युक्रेन युद्धाबाबत ट्रम्प यांचा सल्ला रशियाचे अध्यक्ष पुतिन किती ऐकतील याचा अंदाज अद्याप कोणाला नाही. मुळात ट्रम्प हे पुतिन यांस या मुद्द्यावर रोखू इच्छितात किंवा काय, हा खरा प्रश्न. याआधी पुतिन यांनी ट्रम्प यांचे पाणी जोखलेले आहे आणि ट्रम्प यांच्या अध्यक्षपूर्व रशिया दौऱ्यात त्यांना कोणकोणत्या गोष्टी पुतिन यांनी 'पुरवल्या' याचीही चर्चा झालेली आहे. दुसरे असे की २०१६च्या अध्यक्षीय निवडणुकांत पुतिन यांची ढवळाढवळही सर्वश्रुत आहे. त्यामुळे ते ट्रम्प यांस कितपत भीक घालतील हा प्रश्न. तोच चीनच्या क्षी जिनपिंग यांसही लागू होतो. चीन आणि जिनपिंग हे विचित्र रसायन आहे. त्यांना केवळ चीन महासत्ता होण्यात रस नाही. त्यांचा भर आहे तो जगाची आहे ती घडी विस्कटून टाकण्यात. त्यासाठी चीनने स्वत:च्या अर्थव्यवस्थेचा आकार इतका वाढवला की जगातील अनेक देशांच्या बाजारपेठांतून आज चिनी उत्पादने ओसंडून वाहताना दिसतात. त्यामुळे अन्य देशांची- त्यातही अमेरिकेची अधिक- चीनशी व्यापार-तूट अचाट वाढलेली आहे. ती भरून काढण्यासाठी ट्रम्प हे चिनी उत्पादनांची आयात महाग करू इच्छितात. म्हणजे अमेरिकेच्या बाजारातील चिनी उत्पादनांवर भरभक्कम आयातशुल्क लावणे. ही अशी आकारणी एकतर्फी होणार नाही, हे उघड आहे. तसे झाल्यास प्रत्युत्तरात चीनही तशाच स्वरूपाचे काही उपाय योजेल. आज अमेरिकेचा सर्वात मोठा कर्जपुरवठादार चीन आहे. म्हणजे चिनी सरकारने डॉलर प्रचंड प्रमाणावर खरेदी केलेला आहे वा अमेरिकी रोख्यांत लक्षणीय गुंतवणूक केलेली आहे. चीन याचा वापर अस्त्र म्हणून करणारच नाही, असे नाही. तसे झाल्यास जग एका नव्या व्यापारयुद्धास सामोरे जाईल. हे वास्तवाचे ट्रम्प यांच्या दृष्टिकोनातून विवेचन.

त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे आपल्या नजरेतून ट्रम्पोदयाकडे पाहणे. गुरपतवंत पन्नू या खलिस्तानवादी दहशतवाद्याच्या हत्याकटाबाबत आपल्या बदललेल्या भूमिकेचे 'श्रेय' या ट्रम्पोदयाकडे जाते. या पन्नू याच्या हत्याकटात एकही भारतीय गुंतलेला नाही, ही आपली आतापर्यंतची छातीठोक भूमिका. हे पन्नू प्रकरण कॅनडावासी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येच्या पार्श्वभूमीवर समोर आले. निज्जर हत्येसाठी कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी भारतास जाहीर बोल लावले. त्यानंतर काही महिन्यांतच अमेरिकेच्या न्याय खात्याने निज्जर हत्याकटाबाबत वाच्यता केली आणि त्यास मारण्याचा प्रयत्न भारतीयाकडून झाल्याचे सूचित केले. त्यासाठी अमेरिकेने कोणा निखिल गुप्ता यांचे नाव पुढे केले. या निखिल गुप्तास २०२३च्या जून महिन्यात प्राग येथे अटक करून २०२४च्या जून महिन्यात अमेरिकेच्या हाती सुपूर्द केले गेले. अमेरिकी व्यवस्थेने इतके सारे तपशील उघड केल्याने आपली चांगलीच कोंडी झाली. अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, जर्मनी आदी देश एकमेकांत हेरगिरीची देवाण-घेवाण करतात. तसा करार आहे. त्यानुसार निज्जर हत्येचा पुरावा जमा करण्यात अमेरिकी यंत्रणाही सहभागी होत्या. त्यामुळे या मुद्द्यावर कॅनडास अमेरिकेपासून दूर करण्याचा आपला प्रयत्न फसला. त्यानंतर उघड झाला पन्नू हत्याकट. त्यातही अमेरिकी यंत्रणांनी थेट भारत सरकारला बोल लावून आपली चांगलीच अडचण केली. तेव्हा आम्ही असे काहीही केलेले नाही असे आपणास सांगावे लागले. पण ही छातीठोक अस्थानी ठरली आणि अमेरिकेने या मुद्द्यावर एक पाऊलही मागे घेण्यास नकार दिल्यानंतर 'उच्चस्तरीय चौकशी'ची घोषणाही आपणास करावी लागली.

## मैत्रा फाउंडेशन बीडच्या वतीने अंबानगरीचे सुपुत्र तथा कवी भागवत मसने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

मैत्रा फाउंडेशन बीड या सामाजिक संस्थेच्या वतीने अंबाजोगाई शहराचे सुपुत्र तथा सुप्रसिद्ध कवि भागवत रामकृष्ण (बी आर ) मसने यांची राज्यस्तरीय आदर्श शिक्षक म्हणून सन्मानित करण्यात आले. या सन्मान सोहळ्याप्रसंगी जेष्ठ समाजसेवक गौतम खटोड , प्रा गाडेकर,मैत्रा फाउंडेशनचे अध्यक्ष द ल वारे, जिल्हाध्यक्ष संजय राठोड , पत्रकार संग्राम धनवे, श्रीमती हर्षा ढाकणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.हा कार्यक्रम दि १९ रोजी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन, बीड येथे संपन्न झाला. या सन्मान सोहळ्यासाठी राज्यभरातून अनेक शिक्षक देखील सहभागी झाले होते. नुकतेच मैत्रा फाउंडेशन च्या वतीने सन्मानित करण्यात आलेले सुप्रसिद्ध कवि तथा शिक्षक भागवत मसने हे कवी म्हणून देखील सर्वदूर सुपरीचीत आहेत . त्यांनी आपल्या शैक्षणिक विषयां सोबसतच अनेक प्रकारच्या कवितांच्या माध्यमातून केवळ अंबाजोगाई शहरातच नव्हे तर राज्यभरात विविध ठिकाणच्या कवी संमेलनाच्या माध्यमातून विविध विषयांवर प्रकाश टाकला आहे.




भागवत रामकृष्ण मसने यांचे इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतचे शिक्षण हे खोलेश्वर विद्यालय व महाविद्यालयात झाले आहे. १९८९ साली बारावीत असतानाच के. के. एम. कॉलेज मानवत येथे झालेल्या वाद विवाद स्पर्धेत भागवत मसने यांना मराठवाडा स्तरावरील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले होते. पुढे स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात नाट्यशास्त्र विषयात पदवी प्राप्त केली. या महाविद्यालयीन जीवनात वाद विवाद स्पर्धा , वक्तृत्व स्पर्धा , काव्यवाचन स्पर्धा ,अशा विविध प्रकारच्या स्पर्धांमधून एकूण ३२ बक्षीस मिळवण्याचा बहुमान प्राप्त केला आहे . वैयक्तिक सन्मानासह भागवत मसने यांनी तालुकास्तर , कधी जिल्हा तर कधी मराठवाडा विद्यापीठ त्याचबरोबर कधी महाराष्ट्रातुन सांघिक पारितोषिक स्वामी रामानंद महाविद्यालयालास प्राप्त करून दिले आहेत.

एम ए हिंदी ही डिग्री पूर्ण झाल्यानंतर तासिका तत्त्वावर श्री योगेश्वरी महाविद्यालय वरिष्ठ स्तरावर प्राध्यापक म्हणून सात वर्ष काम करतांना अनेक विद्यार्थी वक्तृत्व तसेच वादविवाद स्पर्धेत घडवले. २००२ साली श्री योगेश्वरी नूतन विद्यालयात रुजू झाल्यापासून आजपर्यंत येथेही अनेक विद्यार्थी घडवत आहेत. त्यांनी स्वतः पाच एकांकिका व पाच गीते लिहून विद्यालयाच्या विद्यार्थी चमूद्वारे बीड आकाशवाणीवर सादर करण्याच्या बहुमान मिळवला आहे. मागील अनेक वर्षापासून विविध विद्यालय तथा महाविद्यालयात स्वतःचा एक ते दीड तासाचा हास्य व्यंगात्मक कार्यक्रम सादर करत आहेत. गेल्या वर्षभरात अनेक महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन , एनएसएस शिबिराचा समारोप , विविध ठिकाणच्या वाद-विवाद वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण तसेच अनेक कवी संमेलनाचे बहारदार असे सूत्रसंचालन उत्तम प्रकारे करण्यात त्यांचा हातखंडा आहे.अशा या हरहुन्नरी , सदाबहार व शैक्षणिक विषयांसह अनेक विषयांत पारंगत असणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व भागवत रामकृष्ण मसने यांना मैत्रा फाउंडेशन बीड च्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या सन्मानामुळे भागवत मसने यांच्यावर शैक्षणिक , सामाजिक ,राजकीय तथा अन्य क्षेत्रातील विविध मान्यवराकडून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. तहसिलदार बदनापुर यांच्या न्यायालयात**
**नामदेव गंगाधर इनामे ता. बदनापुर जि.जालना**
**विरुध्द**
**नगर पंचायत कार्यालय बदनापूर / ग्राम पंचायत कार्यालय विल्हाड़ी ता. बदनापुर जि जालना**
**विषय - (जन्म आणी मृत्युची नोंदी सुधारणा अधिनियम, २०२३ अन्वये कलम १३(३) मधील सुधारणेचे अनुषंगाने कार्यवाही करणे साठी)**

प्रति,
नामदेव गंगाधर ईनामे
रा. -विल्हाडी- ता. बदनापुर जि. जालना

ज्या अर्थी नामदेव गंगाधर ईनामे विल्हाडी ता.बदनापुर जि.जालना या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की स्वतः जम्माची नोंद नगरे पंचायत कार्यालय बदनापूर / ग्रामपंचायत कार्यालय येथे जन्माची नोंद घेण्याबाबत खालील प्रमाणे जन्म / मृत्यु तारीख आहे.

नामदेव गंगाधर ईनामे (स्वतः) जन्म दिनाक ०१-०१-१९७३

त्यानुसार मुख्याधिकारी नगरपंचायत बदनापूर / ग्राम पंचायत कार्यालय विल्हाडी ता. बदनापुर जि जालना येथे जन्माची / मृत्युची नोंद घेण्याबाबत आदेशित करण्या बाबत विंनती केली आहे.

त्या अर्थी जाहीर प्रगटन प्रसिध्दी व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या बाबत जर कोणास काहीही आक्षेप असेल तर त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्दी झाल्या पासुन ३१ दिवसाचे आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा, जर नमुद केलेले काळात कोणाचा ही आक्षेप आला नाही तर संबधित प्रकरणात नियमाप्रमाणे योग्य कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी

आज दिनाक १६-०१-२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाचा शिक्यानिशी दिले.

**स्वाक्षरित/-**
**नायब तहसीलदार, म.१ बदनापुर**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार जालना यांचे न्यायालय**

## जाहिर प्रगटण

प्रकरण क्र.यु.७०/२०२५
आतीया सलीम शेख विरुध्द
आयुक्त म.न.पा शहर जालना
प्रकरणः- जन्म मृत्यु नोंदणी कायदा कलम १३/३ प्रमाणे अर्ज.

ज्याअर्थी, अर्जदार नामे आतीया सलीम शेख वय.५४ वर्षे, धदा. घरकाम रा.मक्का मस्जीद जवड अंबड रोड,जालना ता.जि.जालना येथील रहिवाशी असुन अर्जदार यांची मुलगी नामे शिरीन बेगम सलीम शेख हिचा जन्म दिनांक: ०३/०८/१९८८ रोजी राहत्या घरी जालना येथे झालेला आहे. तसे जन्म प्रमाणपत्र द्यावे, या साठी या न्यायालयात ॲड. मुदस्सर एन सय्यद व ॲड. याकुब युसुफ शेख यांच्या मार्फत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर जाहिर प्रगटणाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंदी बाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवासांच्या आत उक्त न्यायालयात लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप अला नाही तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक: १४/०१/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरुन**
**अव्वल कारकुन महसुल**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार जालना यांचे न्यायालय**

## जाहिर प्रगटण

प्रकरण क्र.यु.६९/२०२५
सय्यद नजीर सय्यद अब्दुल कादर
विरुध्द
आयुक्त म.न.पा शहर जालना .
प्रकरणः- जन्म मृत्यु नोंदणी कायदा कलम १३/३ प्रमाणे अर्ज.

ज्याअर्थी, अर्जदार नामे सय्यद नजीर सय्यद अब्दुल कादर वयः ६२ वर्षे, धदा. मजुरी रा. बालाजी गली जालना ता.जि.जालना येथील रहिवाशी असुन अर्जदार यांचा जन्म दि.१९/०३/१९६३ रोजी राहत्या घरी जालना येथे झालेला आहे. तसे जन्म प्रमाणपत्र द्यावे, या साठी या न्यायालयात ॲड. मुदस्सर एन सय्यद व ॲड. याकुब युसुफ शेख यांच्या मार्फत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर जाहिर प्रगटणाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंदी बाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवासांच्या आत उक्त न्यायालयात लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप अला नाही तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक: १४/०१/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरुन**
**अव्वल कारकुन महसुल**

## जाहीर प्रगटन

श्रीमती ए.टी.जगताप ३ रे सह-दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, केज यांचे न्यायालयात.

किरकोळ दिवाणी अर्ज १५/२०२५
दिव्या विरूध्द निरंक

अर्जदार १) दिव्या पि. अविनाश जोगदंड वय-७० वर्षे, दिव्या रा. भिमनगर ता. केज जि. बीड, अ.पा.क.

सख्खी आई सुरेखा भ्र. देवानंद मोरे, वय-३० वर्ष

धंदा - घरकाम, रा. रूम. २०८, दुसरा मजला मटली स्म्रुती बिल्डींग प्लॉट नं. ५९४ पाटील कुलदैवत मंदीरा जवळ सेक्टर -१९ सी. कोपरखैरपणे, नवी मुंबई, ठाणे ४००७०९

मागणी -कलम ३७२ भारतीय वारसा हक्क कायादा १८७२

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत अविनाश रावण जोगदंड रा. भिमनगर, केज. ता. केज जि. बीड, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी विधिज्ञ एन.पी. यादव यांचे मार्फत अर्ज केला आहे.

ज्याअर्थी, अविनाश रावण जोगदंड रा. भिमनगर,केज. ता. केज जि.बीड यांचा मृत्यु दि.०६.१२.२०२४ रोजी स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण रूग्णालय मेडीकल कॉलेज व शासकीय हॉस्पीटल अंबाजोगाई येथे झाला असुन प्रजाशिला अविनाश जोगदंड हया दिनांक २९/११/२०२२ रोजी भिमनगर केज ता. केज जि.बीड वरील अर्जदार हे मयताचे वारस आहेत. मयत अविनाश रावण जोगदंड रा. भिमनगर, केज. ता. केज जि. यांचे निधन झाले आहे. मयताचे नांवावरील दिलेल्या तक्त्यामधील वर्णन केलेल्या बचत खात्यामधील रक्कम मिळणे साठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

| अ. क्र. | बँकेचे नाव | खाते क्र. | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १ | लाईफ इन्सुरन्स कोऑप.ऑफ इंडिया | पॉलिसी क्रमांक ९८८९४०५८१ | १९१४००/- |
| २ | स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा केज | खाते क्र. ००००००३३३०८७८०१२४ | ८९५६.१३/- |
| | | | २००३५६.१३/- |

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत अविनाश रावण जोगदंड व प्रजाशिला अविनाश जोगदंड रा. भिमनगर, केज. ता. केज जि. बीड, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १७.०१.२०२४५ रोजी माझे सहीने व न्यायालयायचे शिक्कयाने दिले. सदर

पुढील तारीख दि. १५/०१/२०२७५ आहे.

**स्वाक्षरित/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय,**
**क.स्तर,केज**

**स्वाक्षरित/-**
**सहा.अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**क.स्तर,केज**

## जाहीर प्रगटन

मा. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अंबड, जि. जालना यांचे न्यायालयात

निशाणी क्र.
किरकोळ दिवाणी अर्थ नं. ०८/२०२५
सीताबाई व इतर व निरंक

अर्जदार १) सीताबाई मंच्छिन्द्र सपकाळ, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, रा. अंबड, ता.अंबड, जि-जालना

२) गणेश मंच्छिन्द्र सपकाळ, वय- ३४ वर्ष, धंदा-नौकरी, रा- अंबड, ता- अंबड, जि. जालना.

३) राणी विश्वास शितोळे, वय २९ वर्षे, धंदा-यस्काम, रा. पळसखेडा ठोंबरी, ता- भोकरदन जि. जालना.

विरुद्ध
गैरअर्जदार :- निरंक,
विषय:- मुंबई रेग्युलेशन ॲक्ट म २ व ७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत.

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की ज्याअर्थी अर्जदार यांनी विधीज्ञ श्री. केएन शर्मा, यांचे मार्फत सदरचा अर्ज असून मुंबई रेग्युलेशन कायदा कलम २ व ७ प्रमाणे अर्जदारास वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केलेला सदरील अर्जनुसार अर्जदार हे वरील ठिकाणी राहणारे आहेत तसेच मयत मंच्छिन्द्र गंगाधर सपकाळ यांचे अर्जदार क्र ह्या पत्नी आहेत. अर्जदार क्र २ हा मुलगा आहे व अर्जदार क्र हि मुलगी असून ती विवाहित आहे मयत मयत मंच्छिन्द्र गंगाधर सपकाळ हे दिनांक २०/११/२०२४ रोजी मयत झाले आहेत. तसेच अर्जदार हे मयताचे कायदेशीर मुळ वारस आहे. अर्जदाराशिवाय अन्य इतर कोणीही वारस नाही. मयत मंच्छिन्द्र गंगाधर सपकाळ यांच्या नंतर शासकीय व निमशासकीय कामासाठी तसेच वीज जोडणी नळ जोडणी सार्वजनीक बांधकाम उपविभाग कार्याल, तहसील कार्यालय, नगर परिषद, ग्रामपंचायत कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय अश्या सरकारी कार्यालयातील नोंदी या वारसाने अर्जदाराच्या नावे करणे असल्याने मयत याचे वारस असल्याबाबतच्या प्रमाणाची आवश्यकता आहे. करिता अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनावारे आम जनतेस कळविण्यात येते की, जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात स्वतः किंवा वकिलामार्फत आपला आक्षेप असल्यास सदर आक्षेप नोंदवावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व कोणाचाही काही आक्षेप नाही म्हणून अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्राचा निकाल देण्यात येईल. दिनांक ०१/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**स्वाक्षरित/-**
**दिवाणी**
**विभागप्रमुख**

**स्वाक्षरित/-**
**अधीक्षक**
**सह दि.न्या.व स्त.अंबड**
**जि.जालना**

पान १ वरून...

**उमेद बीड मिनी...**

या ठिकाणी पार पडले आहे. सरस मध्ये महिलांनी आणलेल्या अनेक उत्पादनाचे पॅकिंग व ब्रँडिंग अतिशय उत्कृष्ट पद्धतीचे होते तसेच उमेदच्या इतर उद्योजक महिलांनाही यापुढे उत्पादनाच्या पॅकेजिंग व ब्रँडिंग चे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच सर्व प्रदर्शनामध्ये डिजिटल ऑनलाइन पेमेंट चा वापर मोठ्या प्रमाणात केल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आदित्य जीवने यांनी महिलांचे भरभरून कौतुक केले. तसेच याप्रसंगी प्रकल्प संचालक श्रीमती संगीता देवी पाटील यांनी आपल्या मनोगतातून महिलांचे कौतुक करून बीड मिनी सरस प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतलेल्या सर्व अधिकारी कर्मचारी विविध विभाग प्रमुख नगरपरिषद , जिल्हाधिकारी कार्यालय , अग्नीशमन विभाग , पोलीस प्रशासन इत्यादी बद्दल कृतज्ञता व्यक्त करून प्रदर्शनाची मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी केल्याबद्दल उपस्थित सर्व पत्रकार बंधूंचे महिलांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन आभार व्यक्त केले. सरस प्रदर्शन विक्री अहवाल व अनुभव जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे विस्तार अधिकारी श्री वैभव जाधव यांनी सादर करून कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा व्यवस्थापक श्री शकील शेख यांनी तर सूत्रसंचालन तालुका अभियान व्यवस्थापक श्रीमती रश्मी गोसावी यांनी केले तर आभार प्रदर्शन जिल्हा व्यवस्थापक आशा पवार यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आदित्य जीवने प्रकल्प संचालक श्रीमती संगीता देवी पाटील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री वासुदेव सोळंके व उमेद चे जिल्हा अभियान व्यवस्थापक श्री मुरहरी सावंत उपस्थित होते.

विक्रमी २५.४७ दक्ष रुपयेची विक्री...

बीड मिनी सरस प्रदर्शन समारोप कार्यक्रमात रेगुलर सर्वसाधारण गटातून उत्कृष्ट गट म्हणून अंबाजोगाई तालुक्यातील संत जनाबाई गट , उत्कृष्ट मांसाहारी खाद्यपदार्थ गट आष्टी तालुक्यातील स्टार गट तर उत्कृष्ट शाकाहारी खाद्यपदार्थ गट श्री साई गट गोविंदवाडी, यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले सदरील विक्री व प्रदर्शनात एकूण ११६ गटांचे स्टॉल लावण्यात आले होते सदर स्टॉल मधून पाच दिवसात विक्रमी २५.४७ दक्ष रुपये ची विक्री करण्यात आली.

**पत्रकार संघ आणि ...**

स्वीकारून त्यांनी महिलांना जो मूळव्याधाचा त्रास होतो तो असह्य त्रास कमी करण्याचा निर्णय युवा दशेत घेतला आणि तो उच्च शिक्षण घेऊन पूर्ण केला. त्या जिद्दीने मुळव्याध तज्ञ परिपूर्ण तर झाल्याच पण येणाऱ्या नव्या पिढीतील मुलींना देखील त्यांनी डॉक्टर व्हायचं असेल तर महिला मूळव्याध तज्ञ व्हा असे आवाहन करत वेगळेपण जपलं आहे. आपल्या शेतकरी वडिलांची इच्छा पूर्ण करणाऱ्या आणि असह्य महिलांचे दुखणं कमी करणाऱ्या डॉ. मीरा प्रशांत ढाकणे नागरे यांनी स्वीकारलेले आव्हानात्मक वेगळेपण लक्षात घेऊन पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या

पान १ वरून...

वतीने येणाऱ्या ८ मार्च २०२५ जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानाचा देण्यात येणारा जागतिक श्रीरत्न पुरस्कार हा सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन प्रदान करण्यात येणार आहे. असे आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा शेख आयेशा यांनी जाहीर केले आहे.

**भाजी भाकरीचा आस्वाद..**

दिवसभरातील विविध कार्यक्रम श्रवण करण्यासाठी फुलसांगवी नगरीमध्ये दाखल होत आहेत. धार्मिक कार्यक्रमाचा आनंद लुटल्यानंतर या ठिकाणी चालू असलेल्या भाजी-भाकरीचा पंगतीला बसून प्रसाद घेत आहेत व तृप्तीचा ढेकर देत आहेत. या ठिकाणी आपण आलोत आणि भोजन केले म्हणजे एक आगळे वेगळे समाधान मिळत असल्याचे भाविका मधून बोलले जात आहे. सुमारे सुमारे ६० गावाच्या सहभागातून चालू असलेल्या या अन्नछत्रांमध्ये दर दिवसच आठ ते दहा हजार भाविक भक्त भोजन करून तृप्तीचा ढेकर देत आहेत. यामुळे फुलसांगवीचा सप्ताह म्हणजे अध्यात्माच्या पर्वणी बरोबरच प्रसाद सेवन करण्यासाठी सुवर्णसंधी मांणली जात आहे.

शेतकरी भाविक देतात शेतातील भाजीपाला

आपल्या शेतामध्ये पिकलेला भाजीपाला सत्कारणी लागावा यासाठी अनेक शेतकरी श्री संत वामनभाऊ महाराज पुण्यतिथी निमित्त फुलसांगवी येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये आपल्या शेतामध्ये पिकत असलेली वांगी, बटाटा, लसुन, कोथंबीर, टोमॅटो, गाजर, मेथी, कांदा, गोबी लिंबू फ्लावर इत्यादी भाजीपाला स्वयंपाक ग्रहांमध्ये आणून टाकतात आणि भाविक भक्त या भाजीपाल्याचा तोंडी लावायलाही आनंद घेतात.

श्री संत वामनभाऊ महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा पंचक्रोशी मध्ये गाजलेला सोहळा आहे.या सोहळ्याला भाविक भक्त हजारोच्या संख्येने उपस्थित असतात भाऊच्या दरबारी भाजी भाकरीचा प्रसाद गोड करून घेतात . मी या सप्ताहाला यावर्षी पहिल्यांदाच आलेलो असलो तरी या गावचा सप्ताहाचा उतास पाहून मला या ठिकाणी सेवा करण्याची संधी मिळाली मी माझे भाग्य समजतो. फुलसांगवी च्या सप्ताहामध्ये सुमारे दहा ते बारा हजार लोक दर दिवस भोजनाचा आनंद लुटत आहेत व तृप्तीचा ढेकर देत आहे .

साईनाथ किसन साळवी
सप्ताह स्वयंपाक आचारी

**आ.संदीप क्षीरसागरांनी ...**

उपाययोजना यावेळी सुचविण्यात आल्या. बीड शहरात एकाही ठिकाणी नगर पालिकेची पार्किंग नाही,त्यामुळे काही जागा ज्या पडीक आहेत, किंवा वापरात नाहीत अशा ठिकाणी व्यवसायीक गाळे आणि पार्किंगची सुविधा उपलब्ध केल्यास त्यातूनही उत्पन्न वाढवता येईल अशा देखील सुचना यावेळी करण्यात आल्या. नाविण्यपुर्ण योजनेतून नगर पालिकेला निधी

पान १ वरून...

मिळावा त्या दृष्टीने प्रस्ताव तयार करण्याच्या सुचना आ.संदीप भैय्या क्षीरसागर यांनी दिल्या. शहरात ठिकठिकाणी लोखंडी कचरा कुंड्या ठेवण्यात आलेल्या आहेत. मात्र त्या जाग्यावरच सडून चालल्या आहेत. त्याच्या खरेदीच्या अनुषंगानेही कार्यवाही करावी, स्वच्छता, पाणी पुरवठा, रस्ते, नाल्या, वीज हे मुलभूत प्रश्न तात्काळ मार्गी लावा त्यात हयगय करू नका लोकांच्या तक्रारी प्राधान्याने सोडवा अशा सक्त सुचना आ.संदीपभैय्या क्षीरसागर यांनी अधिकार्यांना दिल्या.

बीड शहरातील जुन्या भाजी मंडईत नगर पालिकेने मच्छीमार्केटसाठी इमारत बांधलेली आहे. रेडिरेकनर प्रमाणे त्याचे भाडे निश्चित करण्यात आले आहे. भाडे जास्त असल्यामुळे त्या ठिकाणी कोणताच व्यवसायीक पुढे येत नाही त्यामुळे नाममात्र दरात तेथील गाळे व्यवसायीकांना दिल्यास नगर पालिकेचे उत्पन्न वाढू शकते अशी सुचना यावेळी अधिकार्यांना करण्यात आली. त्याचबरोबर जुन्या भाजी मंडईत बीओटी तत्वावरील आणखी कॉम्पलेक्स बांधता येतील का ? या दृष्टीनेही नगर पालिकेने प्रयत्न करावेत. जेणेकरून पालिकेच्या उत्पन्नात भरत पडेल अशीही चर्चा या बैठकीत करण्यात आली.

**पाणी तपासणीसाठी चक्क...**

आहे का? असा प्रश्न निर्माण झाला असून त्या बाटल्याच्या झाकणावर टँगो, बॉबी, संत्रा लिहिलेले लेबल तरी काढून प्रयोगशाळा प्रशासनाने अशा बाटल्यांचा वापर करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे. पाणी तपासणी प्रयोगशाळेतून जिल्ह्याच्या आरोग्याचा प्रश्न अवलंबून असतो. पाणी योग्य आहे की अयोग्य आहे या अहवालावर बीडचे नागरिक व ग्रामस्थ पाण्याचा वापर करतात. जर अशाप्रकारे दारूच्या बाटल्यात पाणी नमुणे तपासणी होत असेल तर ही बाब गंभीर आहे. प्रयोगशाळा प्रशासन या दारूच्या रिकाम्या बाटल्या योग्यरित्या स्वच्छ करत असतील का? असाही प्रश्न सर्वसामान्यांना पडला असून दारूचे लेबल पाहून पाण्याच्या तपासणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याची जिल्हाधिकार्यांनी नोंद घेणे आवश्यक आहे.

प्राथमिक आरोग्यकेंद्र, खासगी शाळा, तसेच शहरातील हॉटेल व इतर सार्वजनिक ठिकाणी वापरात असलेले पाणीनमुणे या प्रयोगशाळेत तपासणीसाठी येतात. पाणीतपासणीवर प्रयोगशाळा प्रशासन लाखो रुपये खर्च करत असावे तसेच या पाणीनमुणे तपासणीवर लोकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. त्या दृष्टीकोनातून उपसंचालक पुणे यांनी पाणी तपासणीसाठी काचेच्या बाटल्या उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. परंतु प्रयोगशाळा प्रशासन या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करताना दिसत असून अशाप्रकारे देशीदारूच्या रिकाम्या बाटल्यात पाणीनमुणे तपासणीसाठी घेणे योग्य आहे का? याचा प्रयोगशाळा प्रशासनाने विचार करण्याची गरज आहे.

# अंबाजोगाई तालुका पत्रकार संघाचा राज्यस्तरीय 'मूकनायक' पुरस्कार 'आयबीएन' लोकमतचे ब्युरो चिफ सिध्दार्थ गोदाम यांना जाहीर

## 'मूकनायक' पुरस्काराचे २८ जानेवारीला मान्यवरांच्या हस्ते दिमाखदार सोहळ्यात वितरण

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई तालुका पत्रकार संघाचा राज्यस्तरीय 'मूकनायक' पुरस्कार 'आयबीएन' लोकमतचे ब्युरो चिफ सिध्दार्थ गोदाम (छत्रपती संभाजीनगर) यांना जाहीर करण्यात आला आहे. दिनांक २८ जानेवारी मंगळवार रोजी सायंकाळी ५.३० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत दिमाखदार सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती अंबाजोगाई तालुका पत्रकार संघाच्या वतीने प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे.



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय वृत्तपत्र सृष्टीत अगणित योगदान आहे. त्यांच्या प्रखर व तेजस्वी लेखणीने भारतीय लोकशाही अधिक मजबूत झाली. अशा महामानवाने 'मूकनायक' हे वृत्तपत्र ३१ जानेवारी १९२० रोजी उपेक्षित, शोषित, पिडीतांसाठी समर्पित केले. त्या निमित्ताने अंबाजोगाई तालुका पत्रकार संघाच्या वतीने ३१ जानेवारीला दरवर्षी 'मूकनायक' दिनाचे आयोजन करण्यात येते. यंदा हा कार्यक्रम २८ जानेवारीला पार पडणार आहे.

'आयबीएन' लोकमतचे ब्युरो चिफ सिध्दार्थ गोदाम हे गेल्या अनेक वर्षांपासून इलेक्ट्रॉनिक्स माध्यमात कार्यरत असून त्यांनी इलेक्ट्रॉनिक्स आणि प्रिंट मिडियात महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी तर प्रमुख अतिथी म्हणून अंबाजोगाईचे उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे असणार आहेत. कार्यक्रमात शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव होणार आहे. यात यमुना जनार्धन सोनवणे, सय्यद जहीरअली शाह कादरी, कल्याणी तपकिरे, ईश्वरी खाडे, आरती कस्तुरे, अजय होळंबे, साक्षी देशमुख, वंदना राहुल सुरवसे, अमित राजेसाहेब लोमटे यांचा समावेश आहे.

'मूकनायक' दिनाचा हा कार्यक्रम नगरपरिषदेच्या स्व. विलासराव देशमुख सभागृहात २८ जानेवारी मंगळवार रोजी सायंकाळी ५.३० वाजता होणार आहे. तरी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन अंबाजोगाई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष महादेव गोरे, सचिव गणेश जाधव, संघाचे सन्माननीय सदस्य जगन (बापू) सरवदे, प्रा. प्रदिप तरकसे, परमेश्वर गित्ते, दादासाहेब कसबे, रोहिदास हातागळे, संभाजी मस्के, धनंजय जाधव, विश्वजीत गंडले, दत्ता वालेकर, प्रवीण कुरकूट, रवि आरसुडे, रतन मोती यांच्यासह आदी सदस्यांनी केले आहे.

# भवरवाडी शाळेस मिळाले सुलेखन साहित्य

आष्टी (प्रतिनिधी)

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भवरवाडी ही अत्यंत ग्रामीण भागातील शाळा असून या शाळेत पहिली ते चौथीपर्यंत चे वर्ग आहेत. शाळेची गुणवत्ता वाढावी व आपलाही विद्यार्थी शहरी भागातील विद्यार्थ्यांसारखा व्हावा या दृष्टीने गावातील पालक व सरपंच यांचे नेहमीच सहकार्य राहिलेले आहे.

माझी शाळा माझा अभिमान या अंतर्गत गावचे सरपंच भरत भवर नेहमी शाळेला मदत करत असतात. शाळेतील क्षेत्रभेट, सहल किंवा कोणताही कार्यक्रम असो ते शाळेतील शिक्षकांबरोबर तसेच मुलांबरोबर उपस्थित राहतात. शाळेला कोणतीही अडचण असेल



तर नेहमी सोडवण्यासाठी तत्परता दाखवतात. आपली ही शाळा एक आदर्श शाळा झाली पाहिजे असे त्यांना नेहमी वाटत असते. यातूनच त्यांनी शाळेतील मुलांचे अक्षरे पाहून प्रत्येक विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुंदर व्हावे यासाठी आदरणीय सुनील काकडे सर यांच्या मार्गदर्शनाने व गावचे आदर्श सरपंच भरत भवर यांच्या सहकार्याने शाळेतील सर्व मुलांना सहा हजार रुपयांचे सुलेखन साहित्य भेट दिलेले आहे.

# आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर पर्यावरण संवर्धनासाठी व्हावा - प्रा.डॉ. अर्चना वाघमारे

केज/प्रतिनिधी

बदलती जीवनशैली, वाढलेला भौतिक सुविधांचा वापर,अधुनिक तंत्रज्ञान यामुळे मानवी जीवन आज सर्वोच्च उंचीवर आहे.त्याचबरोबर आज भारतासह संबंध जगात पर्यावरण प्रदूषणा ची समस्या ही अत्यंत धोकादायक स्थितीमध्ये पोंहचली आहे.त्यामुळे सर्वांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर पर्यावरण संवर्धनासाठी करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन प्रा.डॉ.अर्चना वाघमारे यांनी केले.त्या सरस्वती महाविद्यालय,केज येथे भूगोल विभागाच्या वतीने आयोजित दिनांक १४ जानेवारी भूगोल दिनाच्या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख मार्गदर्शन म्हणुन बोलत होत्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महा विद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ.गौतम पाटील तर प्रा. डॉ.वैशाली आहेर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते पृथ्वी ग्लोबचे पूजन करण्यात




आले.अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ.पाटील म्हणाले की, स्वच्छ,सुंदर आणि शुद्ध पर्यावरण हे वर्तमानाची गरज असून भविष्याची ती मागणी आहे.येणाऱ्या पिढ्यांसाठी आपण चांगले पर्यावरण देणे हे प्रत्येकाची नैतिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु.अपेक्षा ठोंबरे हिने केले.तसेच प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख डॉ.नागेश कराळे यांनी केले तर आभार कु. प्रतीक्षा ठोंबरे हीने मानले.

# थंडीचा जोर पुन्हा वाढला गारठ्याने रब्बी ज्वारी संकटात

परळी / प्रतिनिधी

परळी शहर व तालुक्यात थंडीचा कडाका वाढला आहे.पुढील पाच दिवस थंडीची लाट राहील असा अंदाज हवामान खात्याने दिला. परळी शहरात रात्रीच्या तापमानाची नोंद १४ अंशांवर नोंदली जात आहे.थंडी पासून बचाव करण्यासाठी पुन्हा एकदा नागरिक उबदार कपडे घालूनच घराबाहेर पडत असल्याचे दिसून येत आहे.उत्तर भारतात एकामागे एक पश्चिमी चक्रावात येत असल्याने जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या ठिकाणी हिमवर्षाव होत आहे. तर राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्लीमध्ये दाट धुके आहे. उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे महाराष्ट्रात थंडी वाढली आहे.मागील ३ दिवसापासून परळी शहर आणि तालुक्यात थंडीचा कडाका प्रचंड वाढला आहे.किमान तापमानात देखील घट झाली होती.पुढील पाच दिवस थंडीचा जोर कायम राहणार आहे. त्यानंतर आकाश निरभ्र राहील आणि सकाळी हलकेसे धुके पडेल, असा



अंदाज हवामान खात्याने दिला असून या गारव्याच्या परिस्थिती रब्बी पिकांची वाढ खुंटली आहे.

रब्बी पिकावर विपरीत परिणाम

हवेतील तापमानाचा परिणाम थेट पिकाच्या वाढीवर होत असल्याने रब्बी गहू,हरभरा या पिकासाठी वातावरण पोषक असले तरी वाढीच्या अवस्थेत असलेल्या ज्वारीच्या पिकावर थंडीचा विपरीत परिणाम दिसून येत आहेजमिनीचे तापमान कमी झाल्याने रब्बीचे पीक असलेल्या ज्वारी च्या पिकावर चिकट्या रोग पडण्याची शक्यता कृषी जाणकार सांगत असून या रोगापासून पिकाला वाचविण्यासाठी बुरशीनाशक, कीडनाशक फवारणी करण्यात यावी असा सल्ला तज्ञांनी दिला आहे.

### उबदार कपड्याचा पुन्हा आधार

मागील काही दिवसांपासून थंडीचा जोर चांगलाच वाढला असल्याने दिवसभर हवेत गारवा जाणत आहे.थंडीपासून बचाव करण्यासाठी स्वेटर, मफरल, कानटोपी असे उबदार कपडे पुन्हा एकदा नागरिकांच्या अंगावर दिसून येत आहेत तर सकाळी अनेक ठिकाणी धुके पडल्याचे दिसून येत आहे.

# महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्यालातूर झोन अध्यक्षपदी राजेंद्र गायकवाड तर सचिवपदी कल्याण मस्के

केज/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मागास वर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या लातूर झोन अध्यक्षपदी राजेंद्र गायकवाड यांची तर सचिवपदी कल्याण मस्के यांची लातूर येथे दिनांक १९ जानेवारी २०२५रोजी झालेल्या कार्यकारणी बैठकीत बिनविरोध निवड करण्यात आली.महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्यालातूर झोन कार्यकारिणीची निवड दिनांक१९जानेवारी २०२५ रोजी केन्द्रीय उपाध्यक्ष नवनाथ पोटभरे यांच्या अध्यक्षतेखाली लातूर,बीड,धाराशिव येथील संघटनेच्या प्रमुख पदाधिकारी वसभासदांची बैठक लातूर येथीलमराठी पत्रकार भवनात घेण्यात आली या बैठकीतमहाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्यालातूर झोन अध्यक्षपदी राजेंद्र गायकवाड यांची तर



सचिवपदी कल्याण मस्के यांची २०२५ वर्षासाठी सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली व लातूर झोन संघटनेची पुढीलप्रमाणे कार्यकारणी निवडण्यात आली. संघटनेच्यालातूरउपाध्यक्ष पदी एस.ए.फटाले यांची तर बीड जिल्हा उपाध्यक्ष पदी बाळासाहेब हळगावकर तर धाराशिव जिल्हा उपाध्यक्षपदी दीपक कोलते यांची तर सह सचिवपदी डी.बी. घाटेराव धाराशिव यांची निवड करण्यात आली. संघटनेच्या संघटकपदी डि.के.गवळी लातूर, कार्याध्यक्षपदी बालाजी कांबळे उदगीर,कोषाध्यक्ष पदी विष्णू तेलंग केज यांची निवड करण्यात आली महिला प्रतिनिधी पदी सारिका भालेराव लातूर यांची तर प्रसिद्धी प्रमुख पदी राहुल साबळे लातूर यांची कार्यकारणी सदस्यपदी बापू जगदे धाराशिव,सय्यद मुलानी धाराशिव,संजय नाटकरे निलंगा,प्रमोद सोनवणे लातूर,मुजम्मील शेख बीड,अतुल सिताप अंबाजोगाई यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.संघटनेच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या यावेळी महाराष्ट्रराज्यमागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे केंद्रीय सचिव नवनाथ पोटभरे यांनी सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत. महाराष्ट्रराज्यमागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीस संघटनेच्या सदस्यांनी शुभेच्छा दिल्या

# स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल मध्ये वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटनसंपन्न

केज/प्रतिनिधी

स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल मध्ये दि.२० जानेवारी २०२५सोमवारी वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जीवन विकास शिक्षण मंडळाचे सचिव श्री.जी.बी.गदळे सर हे होते.तर उद्घाटक संस्थेचे अध्यक्ष श्री.अंकुशराव इंगळे यांच्या हस्ते संपन्न झाले. पाहुण्यांचे स्वागत शाळेचे मुख्याध्यापकश्री.कोकीळ सर व श्री.विनोद गुंड, तालुका क्रीडा संयोजक यांनी केले.यावेळी मार्गदर्शन करताना या शाळेचे खेळाडू राज्य राष्ट्रीय स्पर्धत सहभागी व्हावेत अशी आशा व्यक्त केली.या वेळी विद्यार्थी यांनी सुत्रसंचलन केले व खेळाडूनी स्पर्धेची शपथ घेतली.या कार्यक्रमात विविध तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय खेळाडूंना प्रशस्तीपत्रक व मेडल देण्यात




आले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.जाधव मॅडम यांनी केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.विनोद गुंड यांनी केले या क्रीडास्पर्धेत कबडी,खोखो,योगा, बुध्दिबळ,रोपजंम्प, बॅडमिंटन या स्पर्धा दि.२० जानेवारी व २१ जानेवारी असे दोन दिवस चालणार आहे.या स्पर्धेसाठी सौ. तपसे मॅडम,सौ.विटेकर मॅडम,सौ.कल्याणकर मॅडम,सौ.लोखंडे मॅडम, श्री.वाघमोडे सर,सौ. काळे मॅडम,सौ.चोले मॅडम,सौ.कापसे मॅडम, सौ.हंडीबाग मॅडम,सौ. सावंत मॅडम,सौ.पालवे मॅडम शिक्षक व शिक्षका व शिक्षकेत्तर कर्मचारी मेहनत करत आहेत.

# आंबेजोगाई येथे २८ जानेवारी रोजी जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन

आंबेजोगाई (प्रतिनिधी)

अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज, दक्षिण पीठ, नाणीज धाम, यांचा २८ जानेवारी रोजी, रामदेव बाबा मंदिर ट्रस्ट, श्री संजय किशनराव भोसले (मुख्य प्रवर्तक) यांच्या शेतात आनंद नगर येथे, आंबेजोगाई शहरांमध्ये भव्य पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन केलेले आहे. जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या स्व-स्वरूप संप्रदायाच्या वतीने देशभरामध्ये वेगवेगळ्या माध्यमातून समाज उपयोगी कार्य केले जाते यात संस्थांनच्या वतीने विनामूल्य ५४ म्बुलन्स राष्ट्रीय महामार्गावर चालतात, गोरगरीब व गरजू मुलांना इंग्रजी माध्यमाचे श्रज्ञस ते बारावीपर्यंत शिक्षण मोफत दिलं जातं, हिंदू धर्मातून इतर धर्मात गेलेल्या लोकांना हिंदू धर्मात परत आणून त्यांचा रोटी बेटीचा व्यवहार संप्रदायामार्फत चालू करून दिला आहे, लाखो लोकांची व्यसन मुक्ती आजपर्यंत महाराजांनी केली आहे, आताच ४ जानेवारी ते १९ जानेवारी दरम्यान या पंधरा दिवसाच्या कालावधीमध्ये सांप्रदायाच्या माध्यमातून १ लाख ३६ हजार २७० रक्त कुपेकेच सांप्रदायाच्या मार्फत महाराष्ट्र शासनाला दान करण्यात आलं हा विश्व विक्रमच आहे, ७ अवयव दान या संप्रदायाच्या माध्यमातून झालेले आहेत, त्याचबरोबर ७८ देहदान मेडिकल कॉलेजला आजपर्यंत सांप्रदायामार्फत सुफुर्द करण्यात आलेले आहेत, मागे महाड, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी येथे पूर परिस्थिती निर्माण झाली त्यावेळेला सांप्रदायामार्फत मदतीचा हात देण्यात आला त्यामध्ये धान्यवाटप असेल साफ सफाईचे कामे असतील हे सर्व सांप्रदायमार्फत केले गेले, असे अनेक विविध उपक्रम सांप्रदायामार्फत राबविण्यात येत आहेत दरवर्षी पादुका दर्शन सोहळ्याच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप असेल, शाळेला प्रयोग शाळेचे साहित्य वाटप असेल, शेतकऱ्यांना गाई, म्हशी, शेळ्यांचे, कृषी साहित्याचे, बियाणाचे वाटप असेल, असे अनेक उपक्रम सांप्रदायमार्फत समाज उपयोगी चालवले जातात.

या कार्यक्रमा दिवशी २८ जानेवारी रोजी सकाळी आठ वाजता शिवाजी चौक आंबेजोगाई येथून भव्य शोभा यात्रेला प्रारंभ होणार आहे दहा वाजेपर्यंत शोभायात्रा कार्यक्रम स्थळी पोहोचणार आहे, कार्यक्रमाच्या ठिकाणी दिवसभर कार्यक्रम चालणार आहेत यात पादुका व गुरुपूजन सोहळा जगद्गुरुंचे पादुका पूजन, सामाजिक उपक्रमा अंतर्गत ५४ शिलाई मशीनचे गोरगरिबांना वाटप, प्रवचन, आरती



सोहळा, उपासक दीक्षा, दर्शन, महाप्रसाद व पुष्पवृष्टीने कार्यक्रमाची सांगता होणार आहे, तरी या कार्यक्रमासाठी जिल्हाभरामधून तसेच आंबेजोगाई तालुक्यातून हजारो भाविक या चरण पादुका दर्शन सोहळ्याचा लाभ घेणार आहेत तरी आंबेजोगाई तालुक्यातील शहरातील व बीड जिल्ह्यातील सर्व भक्त गणांना विनंती करण्यात येते की आपण या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहायचे आहे आणि गुरुमाऊलीच्या सिद्ध पादुकांचे दर्शन घेऊन हा कार्यक्रम पूर्ण पार पाडून आशीर्वाद घेवून जायचे आहे, असे बीड जिल्हा स्व-स्वरूप सांप्रदायाच्या वतीने सर्वांना आवाहन करण्यात आलेले आहे.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात मराठीभाषा संवर्धन पंधरवडा निमित्त विविध सांस्कृतीक कार्यक्रम

केज/प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज.जि.बीड येथे दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२५ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा विविध सांस्कृतीक कार्यक्रमांनी साजरा होत आहे.या विविध कार्यक्रमात मराठी भाषेच्याग्रंथांचे ग्रंथप्रदर्शन व्याख्यान,ग्रंथवाचन, काव्यवाचन,कथाकथन, उत्स्फुर्त भाषण,चर्चासत्र, परिसंवाद आदी विविध कार्यक्रमाने साजरा होत आहे.मराठी भाषा संवर्धन पंधरवडा या अंतर्गत आयोजित विविध सांस्कृतीक कार्यक्रमाचे उद्धाटनसरपंच सौ.अंजना गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाजसेवक वसुदेवबप्पा गायकवाड हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत सदस्या सौ. गंगाबाई भोगजकर,शोभा गायकवाड,शिवाजी नाना गायकवाड,ग्रा.पं.सदस्य नारायण गायकवाड यांची उपस्थिती होती.दि.१४ जानेवारी २०२५ रोजी ग्रंथप्रदर्शन व व्याख्यान कार्यक्रमा बरोबरच तीळगुळ वाटप कार्यक्रम झाला.दि.१५ जानेवारी २०२५ रोजी ग्रंथवाचन कार्यक्रम घेण्यात आला. कृष्णा गायकवाड,सोहम गायकवाड,मयुरी गायकवाड,दिव्या साबळे, यशराज भोगजकर यांनी ग्रंथ वाचन केले.व वाचकांनी ग्रंथप्रदर्शनातही सहभाग नोंदवला.दि.१६ जानेवारी २०२५ रोजी ग्रंथप्रदर्शन व चर्चासत्र घेण्यात आले.दि.१७ जानेवारी २०२५ रोजी




ग्रंथ प्रदर्शन व परिसंवाद घेण्यात आला.दि.१८ जानेवारी २०२५ रोजी ग्रंथप्रदर्शन व उत्स्फुर्त भाषण घेण्यात आले.दि. १९ जानेवारी २०२५रोजी ग्रंथप्रदर्शन व कथाकथन कार्यक्रम घेणात आला. दि.२० जानेवारी २०२५ रोजी ग्रंथप्रदर्शन व काव्यवाचन कार्यक्रम घेण्यात आला.दि.२८ जानेवारी २०२५ पर्यंत ग्रंथप्रदर्शन चालणार आहे व उर्वरीत सांस्कृतीक कार्यक्रम होणार आहेत.

मराठी भाषेला केंद्र सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिलेला आहे आता आपल्या सर्वांची जबाबदारी आहे मराठी भाषेला ज्ञानभाषा व जागतीक भाषा बनवण्याची म्हणूनआपण सर्वांनी सर्व मराठी भाषीकांनी मराठी भाषेतूनच बोलले पाहिजे, मराठी पुस्तके वाचली पाहिजेत,ग्रंथालयाचा सर्वांनी नियमीत मराठी भाषीक ग्रंथसंग्रह वाचला पाहिजे.मराठी भाषेला ज्ञानभाषा व जागतीक भाषा बनवण्याची आपल्या सर्व मराठी भाषीकांची जबाबदारी आहे ती आपण सर्वजण मिळून पार पाडूयात असे आवाहन व प्रतिपादन वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.झालेल्या सर्व कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला उर्वरीत कार्यक्रमालाही असाच उदंड प्रचंड प्रतिसाद असावा अशी अपेक्षा ही वाचकांकडून वसुदेवबप्पा गायकवाड यांनी केली.


# वाल्मीक कराडच्या जामिनावरील सुनावणी पुन्हा लांबली

## खंडणी प्रकरणात कराडविरोधात कोणताही पुरावा नसल्याचा वकिलाचा दावा

बीड / प्रतिनिधी

बीडच्या सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाशी संबंधित खंडणी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या वाल्मीक कराडच्या जामिनावरी सुनावणी कोर्टाने आज पुन्हा एकदा लांबणीवर टाकली. आज केज कोर्टापुढे ही सुनावणी होणार होती, पण कोर्टाने ऐनवेळी ती लांबणीवर टाकली. यामुळे जामिनाच्या प्रयत्नांत असणाऱ्या वाल्मीक कराडला जोरदार झटका बसला आहे. दरम्यान, बचाव पक्षाच्या वकिलांनी खंडणी प्रकरणात वाल्मीक कराडविरोधात कोणताही पुरावा नसल्याचा दावा केला आहे.

वाल्मीक कराडचे वकील अशोक कवडे कोर्टाच्या सुनावणीपूर्वी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, वाल्मीक कराडने खंडणी मागितल्याचा किंवा त्यांना खंडणी देण्यात आल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. त्यांचा या गुन्ह्याशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कोणताही संबंध नाही. पण माध्यमांच्या दबावामुळे नाहक त्यांना या प्रकरणी गोवण्यात आले आहे.



वाल्मिक कराडला खंडणीच्या गुन्ह्यात १४ जानेवारी रोजी न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. त्यानंतर आम्ही तत्काळ जामिनासाठी याचिका दाखल केली. त्यावर कोर्टाने सरकारी पक्ष व तपासी अधिकाऱ्यांचे उत्तर मागितले. सरकारी पक्षाने आपले उत्तर दाखल केले आहे. या प्रकरणी १८ जानेवारी रोजी सुनावणी होणार होती. मात्र माझी प्रकृती ठीक नसल्यामुळे ही सुनावणी आज सोमवारी होणार होती.

तपासी अधिकारी खुलासा करतील

बचाव पक्षाच्या वकिलांनी यावेळी संतोष देशमुख हत्याकांड व खंडणीच्या गुन्ह्याचा वाल्मीक कराडशी संबंध आहे किंवा नाही याचा खुलासा तपास अधिकारी करतील असेही सांगितले. संतोष देशमुख हत्या व खंडणीच्या गुन्ह्याशी वाल्मिक कराड यांचे कनेक्शन आहे की नाही? या गुन्ह्यासंदर्भात त्यांच्याकडे तसे पुरावे आहेत का नाही? हे तपासी अधिकारी कोर्टसमोर स्पष्ट करतील, असे ते म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे वाल्मीक कराडने खंडणी प्रकरणात गत ३१ डिसेंबर रोजी पुण्यातील सीआयडी कार्यालयात आत्मसमर्पण केले होते. त्यानंतर आता त्याच्यावर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे त्याला जामीन मिळणे अवघड असल्याचे सांगितले जात आहे. पण प्रत्यक्ष न्यायालयात काय होते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### आज जामिनावर होणार सुनावणी

हे प्रकरण प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर चालणार आहे. या प्रकरणी न्यायालयात जोरदार युक्तिवाद होईल. न्यायालय आमची बाजू ऐकून घेईल. या दोन – तीन बाबी विचारात घेऊन आम्हाला जामीन मिळेल असा अंदाज आहे. आमच्या पक्षकाराचा न्यायालयावर विश्वास आहे. त्यांच्यावरील १४ गुन्ह्यांपैकी ११ ते १२ गुन्ह्यातून त्यांना दोषमुक्त करण्यात आले आहे. एक ते दोन गुन्हे राजकीय आंदोलनाच्या संदर्भात परळी न्यायालयात प्रलंबित आहेत. ही यादी वाल्मीक कराड यांनी स्वतःहून दाखल केली आहे, असेही वकील अशोक कवडे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# पंकजा मुंडेंच्या मनात बीडचे पालकमंत्रीपद न मिळाण्याची सल?

## म्हणाल्या – मी बीडची लेक, पालकमंत्रीपद मिळाले असते तर आनंद झाला असता



नागपूर – मी बीडची लेक आहे. मला बीडचे पालकमंत्रीपद मिळाले असते तर आनंद झाला असता, असे वक्तव्य पंकजा मुंडे यांनी केले आहे. मी पाच वर्ष बीडची पालकमंत्री होते. त्यावेळी बीडचा चांगला विकास झाला होता. बीडची सेवा करण्याची संधी मिळाली असती, तर आनंद झाला असता, असेही त्या म्हणाल्या. पंकजा मुंडे सोमवारी नागपूरमध्ये माध्यमांशी बोलत होत्या. पंकजा मुंडे यांच्या या वक्तव्यामुळे त्यांच्या मनात बीडचे पालकमंत्रीपद न मिळाण्याची सल असल्याचे दिसत आहे.

सरकारकडून नुकतीच पालकमंत्र्यांची यादी जाहीर करण्यात आली. मंत्रीपदाप्रमाणेच पालकमंत्री पदावरून काहींना संधी नाकारण्यात आली. सर्वांचे लक्ष लागून असलेले बीडचे पालकमंत्री पद हे मुंडे बंधू-भगिनीपैकी एकालाही न देता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे गेले. संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांचे नाव आल्यामुळे बीडचे पालकमंत्रीपद त्यांना देऊ नये, अशी बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेत्यांची मागणी होती. त्यामुळे धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांना बीडचे पालकमंत्रीपद नाकारल्याची चर्चा सुरू आहे.

मला बीडचे पालकमंत्रीपद मिळाले असते, तर मला आनंद झाला असता, अशी भावना पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली.

# चळवळीतला योद्धा भारतीय जनता युवा मोर्चा विद्यार्थी विभागाचा प्रदेश कार्यकारणी सदस्य

## अभावीप मध्ये पदासाठी नाही विद्यार्थ्यांना न्याय भेटावा यासाठी काम केलं

बीड ।प्रतिनिधी

विद्यार्थी चळवळीतून आपल्या सामाजिक आणि राजकीय वाटचालीस सुरुवात करून बीड जिल्ह्यातील अत्यंत दुर्मिळ गाव खेड्यातील युवा शिक्षण घेण्यासाठी कोसो दूर जातो आणि आपल्या शैक्षणिक क्षमतेच्या बळावरती आणि समाजामध्ये परिवर्तन घडवण्यासाठी विचार करायला लागतो आणि तिथूनच सुरू होते. विद्यार्थी चळवळ आणि विद्यार्थ्यांचे अनेक प्रश्न घेऊन बाजारू शैक्षणिक संस्थांना वेठीस धरून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देणे तसेच विद्यार्थ्यांची कौशल्य ओळखून त्यांना योग्य संधी कशी निर्माण करता येईल यासाठी सुद्धा अनेक प्रयत्न केले तसेच विद्यार्थी हा विद्यार्थी न राहता तो एक भारताच्या व्यवस्थेतील विचारवंत नागरिक कसा होईल यासाठीच अतोनात प्रयत्न करून कार्य केले. म्हणूनच सर्व क्षेत्रातून कौतुक तर झालेच पण इथेच न थांबता अजून पुढे जाऊन सामाजिक व्यवस्था राज्यातील असेल



देशातील असेल यामध्ये सुधारणा करण्याची ओढ लागून राहिली आणि त्यातूनच अनेक विचार या ठिकाणी उभे राहिले अशा या विचारातून नेहमी वेगवेगळ्या माध्यमातून कार्य करण्याची जिद्द चिकाटी ही कायमस्वरूपी मनामध्ये तर होतीच पण सत्यात उतरवण्यासाठी व्यासपीठाची आवश्यकता असते आणि अशी अनेक व्यासपीठ या ठिकाणी उपलब्ध होत गेली पण राजकीय सत्ता असल्याशिवाय आणि व्यवस्थित चा भाग असल्याशिवाय आपण जास्त काही करू शकत नाही यासाठीच भारतीय जनता युवा मोर्चा विद्यार्थी विभागात प्रदेश कार्यकारिणी सदस्य म्हणून नियुक्ती झाली आणि ही दिलेली संधी या राज्यातील विद्यार्थ्यांच्या हितासाठी कशी वापरता येईल. हाच प्रयत्न नेहमी राहणार आहे मग विद्यार्थ्यांचे प्रश्न मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस असतील यांच्यापर्यंत घेऊन जाऊन ते कसे मार्गी लागतील त्यासाठी काय करावे लागेल ते सर्व प्रयत्न आगामी काळामध्ये करणार आहे व भारतीय जनता पार्टी सारख्या जगातील सर्वात जास्त सदस्य असलेल्या पार्टीमध्ये राहून पार्टीची उंची अधिकाधिक वाढवण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांमध्ये जाऊन संपर्क आणि संवादाच्या माध्यमातून आगामी काळामध्ये काम करण्याचे नियोजन आखले आहे यासाठी सर्व सहकाऱ्यांच्या माध्यमातून आणि मार्गदर्शनाने पुढील कार्य करण्याचे ठरविले असल्याने नक्कीच ठाम विश्वास आहे की भारतीय जनता युवा मोर्चा विद्यार्थी विभाग हा राज्यातील विद्यार्थी हिताचा आणि विद्यार्थ्यांच्या सक्षमीकरणाचा एक प्लॅटफॉर्म असेल हे आगामी काळामध्ये दाखविण्यासाठी पूर्ण ताकतीने भारतीय जनता युवा मोर्चातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली इथून पुढे योग्य पद्धतीने कार्य करणार आहे. तसेच भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री अनुपजी मोरे, प्रदेश विद्यार्थी विभाग संयोजक श्री रमाकांत जी कापसे यांचे मी आभार व्यक्त करतो की त्यांनी माझ्यावरती विश्वास ठेवून ही जबाबदारी दिली. देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी, राज्याचे मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या स्वप्नातील भारत घडवण्यासाठी नेहमीच कटिबद्ध राहण्याचे वचन या ठिकाणी घेतले आहे.



# महाराणा प्रताप यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

धारुर / प्रतिनिधी

येथील कैप्टन राजपालसिंह हजारी इंग्लिश स्कूल या शाळेत दि.१९ रविवार रोजी वीर शिरोमणी हिंदू सूर्य महाराणा प्रताप यांची पुण्यतिथि निमित्त अभिवादन करण्यात आले.यावेळी भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा माजी नगरअध्यक्ष डॉ. स्वरुपसिंह हजारी, तालुका अध्यक्ष ड.बालासाहेब चोले, शहर अध्यक्ष दत्ताभाऊ धोत्रे, भाजपा यूवा मोर्चा शहर अध्यक्ष ड.मोहन भोसले, सोशल मीडिया संयोजक रोहनसिंह हजारी, मन की बात संयोजक रामप्रभु मुंडे, माजी स्विकृत नगर सेवक सचिन दुबे, युवा नेते संदीप काचगुंडे, राधाकृष्ण चोले व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



आज पुरुषोतमपूरी येथे कर्मवीर एकनाथ आवाड साहेब जिजा यांना जयंती निमित विनम्र अभिवादन.

# अध्यात्माचा वसा आणि वारसा चालवण्यासाठी बीड जिल्ह्यातील मठाधिपतींचे मोठे योगदान–माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात धार्मिक क्षेत्रात वारकरी सांप्रदाय आणि भाविक भक्त मोठ्या प्रमाणे सहभाग होऊन अध्यात्माचा वसा आणि वारसा चालवतात जिल्ह्यातील मठाधिपती संत महंत हा वसा आणि वारसा चालवण्यासाठी मोठे योगदान देतात असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले आहे

बीड तालुक्यातील मंझरी हवेली येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताह निमित्त रविवारी ह भ प बबन महाराज यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर उपस्थित होते त्यांच्यासोबत विलास बडगे दिनकर कदम अरुण डाके सखाराम मस्के नानासाहेब काकडे सुभाष शिरसागर नवनाथ कुलकर्णी



सर्जेराव खटाणे अर्जुन बहिरवाळ अभिमान अवचट उद्धव क्षीरसागर अर्जुन शिंदे वैभव क्षीरसागर आदी मान्यवर देखील उपस्थित होते यावेळी माऊली महाराज यांनी उपस्थितांचे स्वागत केले

यावेळी बोलताना माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, गेल्या ३३ वर्षापासून मंजरी येथे अखंड हरिनाम सप्ताह अखंडपणे चालू आहे ज्ञानेश्वर माऊली महाराज हे सर्वांना बरोबर घेऊन मंजरी गावात धार्मिक उत्सव साजरे करतात आपणही समाजासाठी काही देणे लागतो या उदात्त भावनेने या ठिकाणी जे जे विकास कामे करता येतील ते करत राहिलो आज याच मंदिरात अनेक कार्यक्रम होत आहेत याचे समाधान वाटते भव्य सभागृह असल्याने या ठिकाणी लग्न समारंभ देखील मोठ्या प्रमाणात होत आहेत तन–मन–धनाने वारकरी सांप्रदाय काम करत असतो म्हणूनच तो सुखी आणि समाधानी असतो चिंतामुक्त जीवन जगण्यासाठी आध्यात्मिक विचार अंगीकारावे लागतात सध्या सोशल मीडिया आणि मोबाईल मुळे प्रत्येकाचे चित्त अस्थिर झालेले आहे यामुळेच की काय ऑस्ट्रेलिया सारख्या देशाने १८ वर्षापर्यंतच्या मुला मुलींना मोबाईल वापरावर बंदी घातली आहे एखाद्या गोष्टीचा वापर हा मर्यादित असावा लागतो त्यामुळे प्रत्येकाने याची काळजी घेतली पाहिजे. धार्मिक विचार रुजवण्यासाठी बीड जिल्ह्यात अनेक मंदिरे,गड आहेत या गडाचे मठाधिपती हा आध्यात्मिक वारसा जतन करण्याचे काम करत आहेत, बीड जिल्ह्यात त्यामुळेच धार्मिक विचाराची देवाण–घेवाण सुरू असल्यामुळे काही प्रमाणात मन माणूस आणि माणूसकी जिवंत आहे,चांगले आणि योग्य संस्कार पुढच्या पिढीला मिळावेत यासाठी धार्मिक कार्यक्रमाची गरज असते जिथे मनाला स्थिर करण्याची ताकद असते,असे सांगून त्यांनी उपस्थित भाविकांना शुभेच्छा दिल्या,प्रारंभी गावात गेल्यावर सरपंच अंबादास गुजर आणि गावकर्यांनी स्वागत केले यावेळी इंजि संतोष खटाने यांचा सत्कार करण्यात आला

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड – ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

# पशुसंवर्धन, दुग्धविकासाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी संशोधकांचे योगदान व नवतंत्रज्ञानाचा अधिक वापर महत्वाचा

## नागपूरला जागतिक पशू आहार शास्त्र परिषदेचे पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडेंच्या हस्ते थाटात उदघाटन

नागपूर ।प्रतिनिधी

ग्रामीण भागाला सावरणाऱ्या शेतीपुरक पशु-पक्षी पालन, मत्स्यव्यवसाय उद्योगाला भविष्यात जर अधिक शाश्वत करायचे असेल तर हवामान बदलाचा विचार करुन प्राण्यांच्या पोषक अन्नद्रव्याचे काटेकोर नियोजन करणे नितांत आवश्यक आहे. याचबरोबर ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना अन्न सुरक्षिततेसह शेतीपुरक उद्योग व्यवसायातून चांगल्या उत्पन्नाची संसाधने अधिक भक्कम करण्यासाठी संशोधकांनी पुढे यावे असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी केले.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाअंतर्गत आयोजित जागतिक पशु आहार शास्त्र परिषदेच्या उद्घाटन समारंभात त्या बोलत होत्या. नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या रजत जयंती सभागृहात आयोजित या समारंभास पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., भारतीय कृषी अनुसंसाधन परिषदेचे महासंचालक डॉ. हिमांशु पाठक, पशुविज्ञान शाखेचे उपमहासंचालक डॉ. राघवेंद्र भट्ट, कुलगुरु डॉ. नितीन पाटील, पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. प्रविणकुमार देवरे व ज्येष्ठ संशोधक उपस्थित होते.

पशुधन, वनसंवर्धन, पर्यावरण आणि शाश्वत जीवनशैलीबाबत भारतीय संस्कृतीने आपल्याला एक अमूल्य देणगी दिली आहे. आपल्या ईश्वरांनीही आपले वाहन पशुधनातून घेतले आहे. याच बरोबर पक्ष्यांनाही सन्मान दिला. पुर्वापार चालत आलेल्या परंपरा व ज्ञानाच्या आधारावर शेतीला पशुधनाची जोड देत यातून अतिरिक्त उत्पादकता आपल्या पुर्वजांनी घेऊन दाखविली. या क्षेत्रातील संशोधकांनी कालपरत्वे दिलेल्या योगदानाच्या साहाय्याने प्रगतीचा एक मोठा पल्ला आपण गाठू शकलो. आजच्या घडीला दुधाच्या उत्पादनात आपण जगात प्रथम क्रमांकावर आहोत. अंडी उत्पादनात दुसऱ्या क्रमांकावर आहोत. ग्रामीण भागाला विकासाची नवी दिशा




देण्याचे सामर्थ्य पशुवैद्यकीय शास्त्रात असल्याचे त्यांनी सांगितले.

पर्यावरणातील संतुलन राखावे

उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीत वाढत्या लोकसंख्येला पुरेल एवढे दुध, मांस, अंडी उपलब्ध व्हावेत, यातील पोषण मुलद्रव्य वाढण्यासह पर्यावरणातील संतुलनही राखले जावे यादृष्टीने आयोजित जागतिक पशु आहार शास्त्र परिषद महत्वाची आहे. या निमित्ताने आपण सर्व संशोधक एकत्र येऊन या क्षेत्राला नवी दिशा द्याल याची खात्री असल्याचे पंकजा मुंडे यांनी सांगितले.

मत्स्योत्पादन क्षेत्रातही आज अनेक संशोधने झाली आहेत. जनावरांच्या चाऱ्याच्या व्यवस्थापनापासून ते मत्स्य बीजोत्पादन, त्यांचे वजन, त्यांना अधिक पौष्टीक करणे यासह जलव्यवस्थापन असे अनेक क्षेत्र संशोधकांसाठी खुले आहेत. दुधाच्या गुणवत्तेपासून गरजेनुरुप उपलब्धतेपर्यंत अनेक क्षेत्रात संशोधक योगदान देत आहेत. या क्षेत्रातील उच्च शिक्षणासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा देण्यासह चांगल्या बदलासाठी आपण सर्व सिध्द होऊ यात, असे त्या म्हणाल्या.

आजवरच्या प्रशासकीय सेवेतील हा माझा सर्वोच्च आनंदाचा क्षण आहे. याच ज्ञानशाखेत माझे शिक्षण झाले असून इथे गुरुजनांच्या उपस्थितीत मला सहभागी होता आले, या शब्दात पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन. यांनी कृतज्ञता व्यक्त केली. सर्व संशोधकांच्या योगदानातून एक उज्ज्वल मार्ग या परिषदेतून मिळेल, असे त्यांनी सांगितले. कुलगुरु डॉ. नितीन पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकात या परिषदेचे महत्व विषद केले. पर्यावरणाच्या संतुलनासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत. भविष्यात असणारी मागणी लक्षात घेता या क्षेत्रात मोठी संधी आहे. विद्यापीठातील संशोधन ग्रामीण भागातील शेवटच्या टोकावर उभ्या असलेल्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी विद्यापीठ कटिबध्द असल्याचे त्यांनी सांगितले. या समारंभात ज्येष्ठ शास्त्रज्ञांचा गौरव करण्यात आला.

---

# मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन प्रश्न मार्गी लावू; 'दादांचा वादा'

## प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्याच्यवतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन

जालना । प्रतिनिधी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे माहिती व जनसंपर्क खाते आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी येथे दिले आहे. विविध कार्यक्रमानिमित्त जालना दौर्यावर असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सोमवार (दि २०) रोजी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्याच्या शिष्टमंडळाने 'चित्रकुट' भास्कर आबा दानवे यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी त्यांनी पत्रकारांना आश्वस्त केले.

प्रसंगी गेल्या अडीच वर्षांपासून वृत्तपत्रांची पडताळणी शासकीय बैठकी अभावी रखडली, दर दोन वर्षांनी दरवाढ अपेक्षित असतांना गेली सहा वर्षात एकदाही दरवाढ नाही, ग्रामीण भागातील पत्रकारांना बस पास अथवा ग्रामीण पत्रकारांसाठी अधिस्विकृती पत्रिकेसाठी पूर्णवेळ पत्रकारितेची अट रद्द करणे, वेब आणि समाजमाध्यमांना जाहिराती देण्यासंबंधी नियमावली निश्चित करण्यात यावी. यासह अन्य मागण्यांसंदर्भात निवेदन दिले. उपमुख्यमंत्री यांनी काही मिनीटात विषय समजुन घेत हा विषय माहिती व जनसंपर्क मंत्रालयाचा असून मुख्यमंत्री महोदयांकडे हे खाते आहे. त्यामुळे त्यांच्यांशी चर्चा करु प्रश्न मार्गी लावू असा वादा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी केला. प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्हाच्यावतीने भेटलेल्या शिष्टमंडळात जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, जिल्हा उपाध्यक्ष नरेंद्र जोगड सुहास वैद्य, आमेर खान, नरेंद्र जोगड यांचा समावेश होता.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या अडीच वर्षांपासून शासकीय संदेश प्रसार नियमावली-२०१८ नुसार शासनमान्य यादीत समावेश करण्यासाठी राज्यभरातील वृत्तपत्रांची पडताळणी झालेली नाही. त्या अनुषंगाने बैठक झालेली नाही. राज्यभरातील अनेक वृत्तपत्रांचे अहवाल शासन दरबारी प्रलंबित आहेत. ग्रामीण भागातील पत्रकारांना मुख्यालयी त्यांच्या तालुका-जिल्ह्याच्या ठिकाणच्या वृत्तपत्र कार्यालयात येण्या-जाण्यासाठी बस पासची सुविधा उपलब्ध करून द्यावी अथवा या पत्रकारांना अधिस्विकृती पत्रिका मिळावी यासाठी पूर्णवेळ पत्रकारितेची अट शिथील करण्यात यावी. तसेच गेल्या सहा-सात वर्षांमध्ये एकदाही दरवाढ झालेली नाही, शासकीय संदेश प्रसार नियमावली २०१८नुसार दर दोन वर्षांनी महागाई निर्देशांकाशी सांगड घालून दरवाढ करणे अपेक्षित होते मात्र, झाली नाही. नियमानुसार दरवाढ करण्यात यावी, या महत्त्वाच्या विषयासह पुढील मुद्यांवर आपल्या स्तरावरुन तातडीने निर्णय घेऊन वृत्तपत्रे व पत्रकारांना न्याय द्यावा.

शासनमान्य यादीत सामाविष्ट असलेल्या लघु संवर्गातील साप्ताहिकांवर शासनाकडून प्रसिद्धीस देण्यात येणार्या दर्शनी व वर्गिकृत जाहिरात वितरण प्रणालीत प्रत्येकवेळी भेदभाव केल्या जात आहे. प्रसिद्धीस देण्यात येणार्या जाहिराती ह्या मोठे, मध्यम संवर्गासह लघु संवर्गातील दैनिकांना दिल्या जातात. मात्र, लघु संवर्गातील साप्ताहिकांना टाळल्या जात आहे. मे. साहेबांना विनंती आहे की, शासकीय संदेश प्रसार नियमावली - २०१८ मधील ४.६.६ या मुद्द्यात बदल करून सर्व संवर्गातील दैनिक-साप्ताहिक वृत्तपत्रांना समान न्यायाने सरसकट जाहिराती देण्यात याव्यात. तसेच मागील वर्षभरात शासनमान्य यादीवरील लघु संवर्गातील साप्ताहिकांचा अनुषेश भरुन द्यावा.

---

## भाजप सदस्य नोंदणी

# ना. पंकजाताई मुंडे, डॉ.प्रीतमताई मुंडे, आ. नमिता मुंदडासह ६ जणांनी एक हजार सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट केले पूर्ण


बीड ।प्रतिनिधी

भाजपच्या वतीने सध्या संपूर्ण महाराष्ट्रात सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जिल्हयात राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, आ. नमिताताई मुंदडा यांच्यासह सहा जणांनी आपले एक हजार सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण केले आहे. दरम्यान या सदस्य नोंदणीला ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त नोंदणी करावी असे आवाहन भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले आहे.

भाजपचे सदस्य नोंदणी अभियान जिल्ह्यात सध्या जोरदार सुरू आहे, बुथ स्तरावरील प्रत्येक कार्यकर्ता यासाठी कामाला लागला आहे. गेल्या आठवड्यात स्वतः ना. पंकजाताई मुंडे यांनी परळीत बैठक घेऊन जास्तीत

### पाचशेहून अधिक सदस्य नोंदणी करणाऱ्यांचे ना. पंकजाताईंनी केले अभिनंदन

### सदस्य नोंदणीला ३१ जानेवारी पर्यंत मुदतवाढ ; कार्यकर्त्यांनी सदस्य नोंदणीचा वेग वाढवावा - जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख



जास्त सदस्य नोंदणी करण्याचे आवाहन केले होते, त्यानुसार सर्व शक्ती केंद्रप्रमुख, बुथ प्रमुख कामाला लागले आहेत. पक्षाने आजी माजी लोकप्रतिनिधींना एक हजार सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट दिले होते, ते ना. पंकजाताई, डॉ.प्रीतमताई मुंडे, आ. नमिताताई मुंदडा, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, आदित्य सारडा (बीड), संजय आंधळे (वडवणी) यांनी पूर्ण केले आहे. तर पाचशे पेक्षा जास्त सदस्य नोंदणी करणाऱ्यांमध्ये अशोक लोढा (बीड) अशोक तिडके (माजलगांव), शरद इंगळे (केज), दादासाहेब नन्नवरे, भूषण पवार (बीड), ड बाळासाहेब चोले (धारूर) यांचा समावेश आहे. या सर्वांचे ना. पंकजाताईंनी अभिनंदन केले आहे.

### ना. पंकजाताई स्वतः घेत आहेत दररोज आढावा

जिल्ह्यातील सदस्य नोंदणीचा आढावा ना. पंकजाताई मुंडे दररोज घेत आहेत, त्यांच्या आवाहनामुळे नोंदणीच्या कामाला वेग आला आहे. सदस्य नोंदणीचा आज शेवटचा दिवस होता, तथापि, भाजपने नोंदणीची मुदत ३१ जानेवारी पर्यंत वाढवली आहे. या वाढीव संधीचा बुथप्रमुख, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी लाभ घेऊन प्रत्येकांनी दोनशेहून अधिक सदस्य नोंदणी करावी असे आवाहन जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले आहे.

---

# मातंग आरक्षण क्रांती दल समन्वय समितीची बैठक संपन्न

## मार्च महिन्यात धडकणार अधिवेशनावर आरक्षणासाठी आरक्षण क्रांती मोर्चा

जालना ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण अंमलबजावणी करीता अनेक वर्षांपासून अनुसूचित जाती व मातंग समाज बांधव मागणी करत असुन सदरील मागणीच्या अनुषंगाने राज्य शासनाने उपवर्गीकरण आराखडा ठरविण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे या समितीला तीन महिने कालावधी देऊन सुद्धा समिती ने कोणतेही काम केले नाही तसेच शासनाने सुद्धा समीतीस सहकार्य केले नाही असा आरोप मातंग समाजाने शासनावर केला आहे तरी शासनाच्या विरुंगळा कारभारामुळे मातंग



समाजात तिव्र संताप पसरला आहे, या अनुषंगाने आज दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी शासकीय विश्रामगृहात मातंग आरक्षण क्रांती दल समन्वय समिती च्या वतीने बैठक पार पडली.या बैठकीत दोन महिन्यांत अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण आराखडा अहवाल बदर समिती ने सादर करुन शासनाने अंमलबजावणी केली नाही तर मार्च महिन्यात मातंग आरक्षण क्रांती दल समन्वय समिती च्या वतीने अधिवेशनावर मोर्चा काढण्यात येईल असे ठरले यावेळी विलास साबळे, विष्णू गवळी, संतोष निकाळजे,रवीराज पाखरे, ललित कुचेकर, अनिल साळवे, अमोल मिसाळ, रवी ईंचे, किशोर आव्हाड, किरन शिरसाठ,राम भालेराव, तरंग कांबळे, आर आर पाटोळे, ड सनी पाखरे, अरविंद शिरगुळे, विशाल शिंदे,राहुल पाखरे, दिनेश लोंढे, मोजेस सोनवणे आदी उपस्थित होते

---

# चुकीच्या आयात निर्यात धोरणामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या हतबल झाला

## शेतीमाला संदर्भात त्रिमूर्ती सरकारचे चुकीचे धोरण सोपान काका मोरे आजिनाथ भाऊ खेडकर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे

प्रतिनिधी ।शिरूर

दिनांक २० शेतकऱ्यांचा शेतीमाल तयार झाला की परदेशातून शेतीमाल सर्व प्रकारचा आयात करून आपल्या शेतकऱ्यांनी तयार केलेल्या शेती मालाचे भाव पाडून महाराष्ट्रातील शेतकरी त्रिमूर्ती सरकारने आर्थिक दृष्ट्या कमकुवत केला आहे असा गभीर आरोप शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर व शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांनी केला आहे केंद्र व राज्य सरकारचे आयात व निर्यात धोरण शेतकऱ्यासंदर्भात चुकीचे आहे गेले चार वर्षांपासून शेतीमालाचे भाव हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी विक्री होत असल्यामुळे शासनाचे बाजारपेठ वर नियंत्रण नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवाशी आर्थिक दृष्ट्या खेळ चालू आहे यावर केंद्र व राज्य सरकारचे नियंत्रण नाही परदेशातील व्यापाऱ्याकडून संबंधित विभागाच्या प्रामुख्याला टक्केवारी दिली जाते व बाजारपेठेतील संपूर्ण भाव पाडले जातात शेतकऱ्यांच्या माल कमी दराने बाजारपेठेत विकला जातो २० २० पासून आज पर्यंत माय बाप शेतकरी बांधवांना पीक विम्याचे पैसे मिळाले नाहीत नुकसान भरपाई अतिवृष्टी व दुष्काळाचे पैसे मिळाले नाहीत विविध शेती अवजारांचे व ठिबकचे अनुदानही मिळाले नाही केंद्र व राज्य सरकारने दिलेले अनुदान व पिक विमा कंपन्याकडून हप्ते तिन्ही माजी कृषिमंत्र्यांना व संबंधित अधिकाऱ्यांनी टक्केवारी घेऊन शेतकऱ्याला फसविले असल्याचा आरोप शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांनी केला देशामध्ये व राज्यात अनेक वेळा शेतकऱ्यांनी बांधवांनी आंदोलने केली तरीही शासन गांभीर्याने दखल घेत नाही दिल्लीमध्ये तर खूप मोठे प्रचंड शेतकऱ्यांचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केंद्र सरकारकडून केला जात आहे ७०० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आंदोलनात आत्महत्या झाल्या आहेत परंतु केंद्राने गांभीर्याने कोणतीही गोष्ट न हाताळल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनाचे विरोधात राग आहे शेतकऱ्यांना केंद्र व राज्य सरकारने शेतीमालाला स्वामीनाथ आयोगाचा किमान आधारभूत हमीभावाचा कायद्याची अंमलबजावणी करून शेतीमालाच्या भावा संदर्भात न्याय द्यावा शेतीमाल तयार झाल्यावर निर्यात परवानगी देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांची आहे केंद्र व राज्यातील निष्क्रिय सरकार शेतकऱ्यांसाठी कर्दन काळ असल्याचा आरोप शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर व शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांनी केला आहे

# ना. पंकजाताई मुंडे श्रीक्षेत्र माहूरगडावर रेणुकामातेचे घेतले दर्शन

## जेसीबीतून पुष्पवृष्टी करत कार्यकर्त्यांनी केलं जोरदार स्वागत

नांदेड ।प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचं आज मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर प्रथमच माहूरला आगमन झालं. देवीच्या साडे तीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या श्रीक्षेत्र माहूरगडावर जाऊन त्यांनी रेणुकामातेचे दर्शन घेतले. यावेळी जेसीबीतून पुष्पवृष्टी करत कार्यकर्त्यांनी त्यांचं



शहरात जोरदार स्वागत केलं.

नागपूर येथील शासकीय कार्यक्रम आटोपल्यावर ना. पंकजाताई मुंडे यांचं दुपारी श्रीक्षेत्र माहूरला आगमन झाले. शहरात येताच आमदार भीमराव केराम, भाजप नेते देविदास राठोड तसेच कार्यकर्त्यांनी त्यांचं जेसीबीतून फुलांची उधळण करत वाजतगाजत जंगी स्वागत केलं माहूरगडावरील श्री रेणुकामातेचे त्यांनी दर्शन घेऊन देवीला साडी अर्पण केली. यावेळी मंदिर संस्थानच्या वतीने त्यांचं हर्षोल्हासात स्वागत करण्यात आलं.

# बीड शहरात २४ ते ३१ जानेवारी दरम्यान श्री समर्थ पादुका प्रचार दौरा भिक्षा फेरी

## सर्वेश्वर गणेशापासून पाटांगणापर्यंत पादुकांची भव्य मिरवणूक

बीड ।प्रतिनिधी

श्री समर्थ रामदास स्वामी संस्थान सज्जनगड येथील पादुका प्रचार व दौराभिक्षा फेरी, जन्मस्थान जांब समर्थ येथून अंबानगरी मार्गे सज्जनगड जाताना बीड शहरात भिक्षा फेरीला शुक्रवार २५ जानेवारीपासून सुरुवात होणार आहे.

ही भिक्षा फेरी व प्रचार दौरा ३१ जानेवारी दुपारी बारापर्यंत चालणार आहे. शुक्रवार २४ जानेवारी रोजी सहयोग नगर मधील सर्वेश्वर गणेश मंदिरापासून सुभाष रोड मार्गे थोरले पाटांगणापर्यंत पादुकांची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे, यावेळी ह. भ. प. महादेव महाराज चाकरवाडीकर, श्री भूषण स्वामी अध्यक्ष सज्जनगड संस्थान , समर्थांच्या घराण्यातील अकरावे वंशज,मान्यवर, लोकप्रतिनिधीची, नागरिक बंधू भगिनीचीं विविध ठिकाणी स्वागताला उपस्थिती असणार आहे.

दिनांक २५ ते ३१ जानेवारी सकाळी आठ ते दुपारी बारा यावेळी शहराच्या विविध भागात भिक्षा फेरीचा कार्यक्रम होईल. पाटांगणावर मुक्कामी असलेल्या पादुका ठिकाणी दररोज सकाळी काकड आरती, अभिषेक व आरती आठ ते बारा पर्यंत भिक्षा फेरी, सायंकाळी सांप्रदायिक नित्य उपासना , किर्तन सेवा, शेजारती होईल. सर्व भाविक भक्तांनी, समर्थ सेवेकर, नागरिक बंधू-भगिनींनी सहभागी होण्याचे आवाहन संपादक दिलीपराव खिस्ती विनायक महाराज पाटांगणकर ,प्रा.डॉ. दीपक देशमुख, समर्थ भक्त कृष्णा महाराज रामदासी यांनी केले आहे.

भिक्षा फेरीचे वेळापत्रक :

शनिवार २५ जानेवारी रोजी धोंडीपुरा, पाटांगण गल्ली, बोबडेश्वर गल्ली,सराफा रोड, टिळक रोड, सुभाष रोड, रविवार २६ रोजी पेठ बीड, हिरालाल चौक, बुरुड गल्ली, काळा हनुमान ठाणा.,सोमवार २७ रोजी, सावरकर महाविद्यालय परिसर, नेत्रधाम, दुधाळ कॉलनी, सहयोग नगर. मंगळवार २८ रोजी, कृषी नगर, नामदेव नगर, पिंगळे



नगर, नाट्यगृह परिसर ,विद्यानगर पश्चिम,बुधवार २९ रोजी, क्रांतीनगर, जवाहर कॉलनी, भक्ती कन्स्ट्रक्शन, श्रीराम नगर,गुरुवार ३० रोजी, गायत्री नगर, चक्रधर नगर, शिंदे, नगर सुमती नगर.

# राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या संयुक्त जन्मोत्सव निमित्त तालखेड येथे भव्य आरोग्य शिबिर

सरपंच ग्रामपंचायत तालखेड व ग्रामीण विकास मंडळ बनसारोळा लिंक वर्कर स्किम बीड यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित भव्य आरोग्य शिबिर दिनांक २३ जानेवारी २०२५ वार गुरुवार वेळ सकाळी ९ते १ उद्घाटक विजयसिंह पंडित आमदार गेवराई

विधानसभा अध्यक्ष कल्याणराव आखाडे संस्थापक अध्यक्ष सावता परिषद तथा प्रदेशाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस ओबीसी विभाग. या शिबिरासाठी तज्ञ डॉक्टर म्हणूनडॉ. श्रेयस देशपांडे,डॉ. अमोल परतुरकर,डॉ. लक्ष्मीकांत यादव, डॉ. नितीन चव्हाण, डॉ. सोमेश्वर घोडके, मा . शहाबुद्दीन शेख. मा सय्यद रईस. वरील शिबिराचा सर्व गरजूंनी लाभ घ्यावा असे आव्हान आयोजक सौ गीतांजली गुलाबराव मोरे सरपंच तालखेडमा. दशरथ राऊत लिंक वर्कर यांनी केले आहे

# अभिनव विद्यालयात हळदी कुंकू व तिळगुळ कार्यक्रम उत्साहात संपन्न

## स्त्री कधीच सामान्य नसते निर्मिती आणि विनाश तिच्या मांडीवर खेळतात त्यामुळे स्त्रियाच समाजाच्या खऱ्या शिल्पकार आहेत-सौ. अंजलीताई सूर्यकांत कातकडे

परळी (प्रतिनिधी)

ज्ञानप्रबोधिनी विकास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अभिनव विद्यालय नेहरू चौक ,परळी-वै येथे संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. गयाबाई साहेबराव फड यांच्या मार्गदर्शनाखाली मकर संक्रांति निमित्त हळदी कुंकू व तिळगुळाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला . यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या कोषाध्यक्षा सौ. अंजलीताई सूर्यकांत कातकडे या , तर प्रमुख पाहुणे म्हणून माध्यमिक विद्यालयाच्या विभाग प्रमुख सौ. ज्योती देशमुख व प्राथमिक विद्यालयाच्या विभाग प्रमुख सौ.मनोरमा देशमुख या होत्या . यावेळी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी संस्थेच्या कोषाध्यक्षा सौ. अंजलीताई सूर्यकांत कातकडे यांनी आपला अध्यक्षीय भाषणामध्ये, स्त्रीया आता यशस्वी होत आहेत आपल्या कर्तुत्वाने आणि धैर्याने त्यांचे नेतृत्व करीत आहेत त्याप्रमाणे आपण आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवला पाहिजे आणि इतरांसाठी प्रेरणा स्तोत्र बनले पाहिजे .कोणत्याही परिस्थितीत कमकुवत न होता जगाला आपले खरे सामर्थ्य



दाखवले पाहिजे. असे त्यांनी स्त्रियांना मार्गदर्शन केले.

हळदी कुंकवा मध्ये उंच माझा झोका- स्त्री कर्तुत्वाला मानाचा मुजरा हा देखावा या कार्यक्रमाचा लक्षवेधी उपक्रम ठरला. या देखाव्यामध्ये शाळेतील मुलींनी समाजात विविध क्षेत्रांमध्ये कर्तृत्व बजावणाऱ्या महिलांच्या वेशभूषेमध्ये तयार होऊन त्यांचे उत्कृष्टपणे सादरीकरण केले. सध्या स्त्रीचे कर्तुत्व हे केवळ घरगुती कामे आणि संगोपनाच्या मर्यादित राहिलेले नाही. स्त्रिया विविध क्षेत्रात जसे की शिक्षा, विज्ञान, तंत्रज्ञान, कला ,साहित्य, अर्थव्यवस्था आणि राजकारणात आपले कर्तुत्व यशस्वीरित्या बजावत आहेत. अशा विविध क्षेत्रातील कर्तुत्वान महिलांचा या निमित्ताने सन्मान करण्याच्या दृष्टीने व महिलांना त्यातून प्रेरणा मिळेल या हेतूने हा देखावा सादर करण्यात आला . या कार्यक्रमास महिला पालकांचा व आमंत्रित महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी शाळेतील सर्व विद्यार्थी ,शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.




माजलगाव (प्रतिनिधी)

लिमगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते तथा आमदार विजयसिंह पंडित यांचे कट्टर समर्थक मा. मोहन शिंदे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा. या उपक्रमाअंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला मोहन शिंदे हे नेहमीच तालखेड सर्कल मधील सक्रिय कार्यकर्ते आहेत ते नेहमी सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करत आहेत गोरगरीब सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी विद्यार्थ्यांच्या प्रश्नासाठी नेहमीच मोहन शिंदे यांनी न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे मोहन शिंदे यांचा वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो मात्र यावेळी सामाजिक भान जपत त्यांनी विविध सामाजिक उपक्रम राबवत आपला वाढदिवस साजरा केला यावेळेस सर्व ग्रामस्थ सर्व शिक्षक वृंद यांनी मोहन शिंदे यांना येणाऱ्या भावी आयुष्यासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या

# मिलिंद माध्यमिक विद्यालयात क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन संपन्न

## क्रिडा स्पर्धांमधून स्नेहभाव वृद्धिंगत होतो - प्रा.अतुल दुबे

परळी (प्रतिनिधी)

येथील नाथ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा अन्न व नागरी पुरवठा मंत्री महाराष्ट्र राज्य ना.धनंजयजी मुंडे साहेब यांच्या संकल्पनेतून व सहसचिव प्रदीपजी खाडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित 'स्व.पंडित अण्णा मुंडे क्रीडा महोत्सवाचे' शानदार उद्घाटन समारंभ प्रसंगी नाथ शिक्षण संस्थेचे समन्वयक प्राचार्य श्री.अतुल दुबे सर विद्यार्थ्यांस मार्गदर्शन करत असताना म्हणाले क्रिडा क्षेत्रात उत्तुंग भरारी घेऊन राष्ट्रीय,अंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू बना.आजचा विद्यार्थी मैदानापासून दूर चालला आहे. विद्यार्थ्यांनी खेळाकडे करिअर म्हणून सुध्दा बघितले पाहिजे. खेळामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व घडते. यश-अपयश पचवण्याची ताकत मैदानी खेळ खेळल्यावरच विद्यार्थ्यांमध्ये येते. सर्वात महोत्वाचे म्हणजे खेळांच्या




माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांचा आपसातील 'स्नेहभाव वृद्धिंगत होतो.'

नाथ शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित ना. धनंजयजी मुंडे साहेब यांच्या संकल्पनेतून व सहसचिव प्रदिप खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्व.पंडित आण्णा मुंडे क्रिडा महोत्सव मिलिंद माध्यमिक विद्यालयात सुरू केला असून भविष्यात तालुका व जिल्हास्तरा पर्यंत आयोजित केला जाईल असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य तथा नाथ शिक्षण संस्थेचे समन्वयक श्री.अतुल दुबे यांनी या उद्घाटन समारंभ प्रसंगी केले.

दि.२० जानेवारी ते २५ जानेवारी २०२५ पर्यंत चालणाऱ्या या क्रिडा महोत्सवात मिलिंद माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज मधील खेळाळूंनी सहभाग नोंदवला आहे. लांब उडी, उंच उडी, १००, २००,४०० मिटर धावणे, कबड्डी, खो-खो, क्रिकेट अशा विविध मैदानी स्पर्धेत अंतरवर्गीय स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोदवला आहे.या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून नाथ शिक्षण संस्थेचे समन्वयक तथा यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.अतुलजी दुबे सर, मिलिंद ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य श्री.किरण शिंदे सर,शाळेचे मुख्याध्यापक श्री.कदरकर सर, पर्यवेक्षक श्री.धायगुडे सर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.नाथ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माननीय ना .श्री.धनंजयजी मुंडे साहेब, सहसचिव माननीय श्री.प्रदीपजी खाडे साहेब


# अजित पवारांच्या बीडच्या पालकमंत्रिपदास विरोध

## जालन्यात दादांना दाखवले काळे झेंडे; धनंजय मुंडे यांना पाठिशी घालण्याचा आरोप

प्रतिनिधी । जालना

मराठा महासंघाच्या कार्यकर्त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे बीडचे पालकत्व देण्यास कडाडून विरोध दर्शवला आहे. त्यांनी या प्रकरणी सोमवारी जालन्याच्या दौऱ्यावर असणाऱ्या अजित पवारांना काळे झेंडे दाखवून आपला रोष व्यक्त केला. अजित पवार सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाप्रकरणी वादाच्या भोवऱ्यात अडकलेल्या मंत्री धनंजय मुंडे यांना पाठिशी घालत असल्याचा आरोप या संघटनेने केला आहे.

बीड जिल्हा सध्या सरपंच संतोष देशमुख हत्याकांडामुळे चांगलाच चर्चेत आला आहे. येथील सर्वपक्षीय नेत्यांनी बीडचे पालकमंत्रीपद धनंजय मुंडे यांना देण्यास तीव्र विरोध केला. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या जिल्ह्याचे पालकत्व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपवले. यामुळे सर्वकाही ठिकठाक झाल्याचे चित्र असतानाच भारतीय मराठा महासंघाने अजित पवार यांच्या पालकमंत्रीपदाला कडाडून विरोध दर्शवला आहे. अजित पवार यांनी बीडचे पालकमंत्रीपद स्वीकारून एकप्रकारे ते धनंजय मुंडे यांना पाठिशी घालण्याचे काम करत आहेत, असा आरोप त्यांनी केला आहे.



### काय म्हणाले आंदोलक?

- संतोष देशमुख हत्या प्रकरणी चौफेर आरोप होणारे मंत्री धनंजय मुंडे हे अजित पवारांच्या पक्षाचे आहेत. या खून प्रकरणाचा तपास कोणत्याही राजकीय दबावाशिवाय होण्यासाठी बीडचे पालकमंत्रीपद हे दुसऱ्या पक्षाच्या नेत्याकडे देण्याची गरज होती. पण अजित पवारांनी स्वतः हे पद स्वीकारल्यामुळे एका अर्थाने ते धनंजय मुंडे यांना पाठिशी घालण्याचे काम करत आहेत. त्यामुळे आम्ही त्यांना काळे झेंडे दाखवून त्यांचा निषेध केला, असे भारतीय मराठा महासंघाचे आंदोलक अरविंद देशमुख यांनी म्हटले आहे.

अजित पवार यांचा ताफा शहरातील भोकरदन नाका येथून जाणार होता. त्यांचा ताफा या ठिकाणी पोहोचताच अचानक ४-५ आंदोलक त्यांच्या ताफ्यापुढे आले. त्यांनी काळे झेंडे दाखवून अजित पवारांचा निषेध केला. या अनपेक्षित घटनेमुळे तिथे बंदोबस्तावर असणाऱ्या पोलिसांची एकच तारांबळ उडाली. त्यांनी आंदोलकांना रोखून धरण्याचा प्रयत्न करत अजित पवारांच्या ताफ्याला मार्ग करून दिला. अवघ्या काही मिनिटांच्या या आंदोलनाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.